मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २१८ ■ रविवार, १९ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# पावसाळीपूर्वीची कामे लवकरात लवकर करण्यात यावे

## नगरसेवक ॲडव्होकेट मनोज भुजबळ यांची आयुक्तांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)** : पावसाळीपूर्वीची कामे लवकरात लवकर करण्यात यावे अशी मागणी नगरसेवक ॲडव्होकेट मनोज भुजबळ यांनी आयुक्तांना निवेदन देऊन केली आहे.पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक ॲड मनोज कृष्णाजी भुजबळ यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त यांना निवेदनाद्वारे पावसाळ्यापूर्वी करण्याची कामे आपले पत्र



देऊन मागणी केली आहे;. यामध्ये त्यांनी अय्यप्पा मंदिर ते देवद कडे जाणाऱ्या नवीन रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसवावे, नवीन पनवेल प्रभाग 17 येथील उंच वाढलेल्या झाडांची पावसाळ्यापूर्वी छाटणी करावी, नवीन पनवेल येथील सेक्टर 12 18 19 मधील हरित पट्ट्यातील गार्डन मधील पथवे दुरुस्ती , संरक्षण भिंतीची दुरुस्ती व झाडांची छाटणी करावी तसेच पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सेक्टर 12 ते 19 मध्ये असलेल्या उद्यानांमध्ये डेकोरेटिव्ह लाईटचे पोल बसविण्याची मागणी त्यांनी निवेदनातून केली आहे.

# पनवेल मध्ये गुटखा विक्रेत्यांवर धडक कारवाई; ७ टपऱ्या सील

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)** : अन्न व औषध प्रशासन विभागाने पनवेलमधील कामोठे आणि आकुर्ली परिसरात मोठी धडक कारवाई करत प्रतिबंधित गुटखा विक्री करणाऱ्या सात टपऱ्यांवर छापे टाकले. सहाय्यक आयुक्त नितीन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी प्रियंका भंडारकर आणि रोहीत लोकरे यांनी ही कारवाई केली असून यात एकूण ३५ हजार ३२८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कामोठे परिसरातील नॅनो पान शॉप, अपना किराणा आणि अन्य दोन पान स्टॉल्सवर धाड टाकून १६ हजार २१९ रुपयांचा साठा मिळून आला, तर आकुर्ली गावातील तीन टपऱ्यांमधून १९ हजार १०९ रुपयांचा गुटखा हस्तगत करण्यात आला. या सर्व सातही टपऱ्या प्रशासनाकडून सील करण्यात आल्या असून संबंधितांविरुद्ध कामोठे आणि खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या धडक कारवाईमुळे बेकायदा गुटखा विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. जिल्ह्यात मर्यादित अन्न सुरक्षा अधिकारी असतानाही प्रशासनाने ही मोठी मोहीम राबवली असून, नागरिकांनी अशा अवैध विक्रीबाबत तक्रार करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# 8 वर्षांच्या अक्षर पाटीलचा "अटल सेतू ते गेटवे ऑफ इंडिया"

## 17 किमी सागरी अंतर पोहून ऐतिहासिक विक्रम

**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी/ सायली साळुंके** : केवळ 8 वर्षांच्या कु. अक्षर दिपाली चेतन पाटील या चिमुकल्याने समुद्राच्या लाटांबरोबर झुंज देत जिद्दीच्या जोरावर "अटलसेतू ते गेटवेऑफ इंडिया मुंबई" हे 17 किमी सागरी अंतर केवळ 2तास 29 मिनिट 29 सेकंदात पूर्ण करून संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आहे. कु. अक्षर दिपाली चेतन पाटीलहा उरणमधील सेंट मेरी कॉन्व्हेंट हायस्कूलमध्ये शिकत आहे.त्याने केलेल्या या ऐतिहासिक विक्रमामुळे उरण तालुक्यांतून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.





दिनांक 17 एप्रिल 2026 रोजी पहाटे 1 वाजून 59 मिनिटांनी अक्षरने अटल सेतूजवळून अरबी समुद्रात झेप घेतली. महाराष्ट्र हौशी जलतरण संघटनेच्या निरीक्षक सुनील नारायण मयेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा पोहण्याचा थरार अथक परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर कु.अक्षरने पूर्ण केला, पहाटे 4 वाजून 29 मिनिटांनी गेटवे ऑफ इंडियाच्या किनाऱ्याच्या पायऱ्या त्यांनी स्पर्श करीत 17 किमीचे अंतर अवघ्या 2 तास 29 मिनिट 29 सेकंदात पूर्ण केले.

मूळ गाव कळंबचा रहिवासी असलेला अक्षर पाटील हा पाटील कुटुंबियांचा लाडका आहे. या ऐतिहासिक कामगिरीच्या वेळी त्याची आजी सुरेखा पाटील, आई मेघा पाटील, आजोबा जगन्नाथ पाटील, मामा अभिषेक पाटील, मामी शुभांगी पाटील यांच्यासह संपूर्ण पाटील परिवार, 'सी स्विमिंग टीम' आणि मित्र परिवार उपस्थित होता. सर्वांनीच अक्षरचे टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

वयाच्या आठव्या वर्षी अटल सेतू ते गेटवे ऑफ इंडिया हे सागरी 17 किमीसारखे आव्हानात्मक सागरी अंतर पार करणे ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे. भर समुद्रातील प्रवाह, रात्रीची वेळ आणि थंड पाणी या सर्वांवर मात करत अक्षरने हा विक्रम नोंदवला आहे. महाराष्ट्र हौशी जलतरण संघटनेने या मोहिमेला अधिकृत मान्यता दिली असून निरीक्षक सुनील मयेकर यांनी वेळेची नोंद ठेवली.

उरण तालुक्यातून एकापाठोपाठ एक जलतरणपटू तयार होत आहेत. अक्षरच्या या यशामुळे केवळ कळंब गावच नाही तर संपूर्ण उरण तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. या वयात अशी कामगिरी करणाऱ्या अक्षरचे सर्व स्तरातून कौतुक होत असून भविष्यात तो आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव उज्ज्वल करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




# नगरसेविका बायजा बारगजे यांचे पती समाजसेवक बबन बारगजे यांच्या प्रयत्नांना यश







**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : कळंबोली प्रभाग क्र. 8 मधील सेक्टर 4-E, 5-E व 6-E येथे शुक्रवारी रात्री अचानक वीजपुरवठा खंडित झाला. नागरिकांनी तक्रार करूनही एमएसईबी कर्मचाऱ्यांनी तातडीने दखल घेतली नाही.

रात्री दीड वाजता सेक्टर 4-E मधील नागरिकांनी समाजसेवक व नगरसेविका पती श्री. बबन बारगजे यांना संपर्क केला. माहिती मिळताच श्री. बारगजे यांनी तात्काळ एमएसईबी कार्यालय गाठून कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या व तिन्ही सेक्टरचा वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आदेश दिले.

शनिवारी दुपारी श्री. बारगजे यांनी एमएसईबीचे सहाय्यक अभियंता श्री. संजय मुंडे यांची भेट घेऊन त्यांना प्रत्यक्ष घटनास्थळी बोलावले. पाहणीदरम्यान अनेक ठिकाणच्या विद्युत केबल खराब झाल्याचे निदर्शनास आले. श्री. मुंडे यांनी तातडीने वरिष्ठांना कळवून दुरुस्तीचे काम सुरू करण्याचे आदेश दिले व प्रत्येक असोसिएशनला स्वतंत्र वीजपुरवठा देण्याच्या सूचना कर्मचाऱ्यांना केल्या.

यावेळी एमएसईबीचे कर्मचारी सागर सुतार, सुनील राऊत, जालिंदर खेडकर, रोहिदास रावते व श्रीकांत धायगुडे उपस्थित होते. सिद्धिविनायक ओनर्स असोसिएशनचे सभासद महेंद्र खबाले, सचिन जाधव, शाकीर सय्यद, वैभव फाळके व महेंद्र पवार यांनी पाहणी दौऱ्यात सहभाग घेऊन नागरिकांच्या अडचणी श्री. बारगजे व श्री. मुंडे यांच्यापर्यंत पोहोचवल्या.

नागरिकांनी रात्री-अपरात्री मदतीला धावून आल्याबद्दल श्री. बबन बारगजे यांचे आभार मानले. "जमिनीवर काम करणारा कार्यकर्ता" अशा शब्दांत नागरिकांनी भावना व्यक्त केल्या.

तातडीने समस्या सोडवल्याबद्दल आशीर्वाद असोसिएशन व स्थानिक कार्यकर्त्यांनीही श्री. बारगजे व एमएसईबी टीमचे आभार मानले.

# एसटी कामगारांच्या वेतनवाढीसाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : मुंबई दिनांक 15 एप्रिल 2026 रोजी संयुक्त कृती समितीच्या प्रतिनिधींनी परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष माननीय नामदार प्रतापजी सरनाईक साहेब यांची भेट घेऊन एसटी कामगारांच्या वेतनवाढीसंदर्भात निवेदन सादर केले.कृती समितीच्या वतीने झालेल्या चर्चेत एसटी कामगारांना 53 वरून 58 टक्के महागाई भत्ता,घरभाडे भत्ता 10/20/30 टक्के,



तसेच 1% वेतनवाढीचा दर व थकबाकीबाबत निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.याशिवाय कामगारांच्या दैनंदिन आर्थिक प्रश्नांवरही सविस्तर चर्चा झाली.

तिकीट दरावर दोन रुपये स्वच्छता अधिभार लावल्यामुळे वाहकांना प्रवाशांच्या तक्रारींना सामोरे जावे लागत असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले.तिकीट दरवाढ ही पाच रुपयांच्या पटीत असावी, अशी आग्रही मागणीही समितीने केली.

मंत्री महोदयांनी यावेळी आश्वासन दिले की, राज्याचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब व मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याशी तातडीने बैठक घेऊन यावर तोडगा काढला जाईल.या भेटीवेळी कृती समितीचे सर्वश्री हनुमंत ताटे, संदीप शिंदे, हिरेन रेडकर, मुकेश तिगोटे, सुनिल निरभवणे, गजानन माने, एम. जी. कांबळे, लक्ष्मण तिडके इत्यादी सहकारी उपस्थित होते.

# पनवेल परिसरातून 19 वर्षीय तरुणी बेपत्ता

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी):** नवी मुंबईतील खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून 19 वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली असून पोलिसांकडून शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, निधी रुदल गौंड (वय 19 वर्षे) ही तरुणी दि. 12 एप्रिल 2026 रोजी दुपारी सुमारे 1 वाजण्याच्या सुमारास आसुडगाव परिसरातून बेपत्ता झाली आहे. ती घरातून बाहेर फिरण्यासाठी गेल्यानंतर परत न आल्याने कुटुंबीयांनी शोध घेतला, मात्र ती सापडली नाही.



या प्रकरणी तिची आई सौ. इंद्रावती रुदल गौंड (वय 50 वर्षे, रा. तुकाराम शेळके यांची चाळ, मराठी शाळेजवळ, आसुडगाव, खांदा कॉलनी, ता. पनवेल, जि. रायगड) यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी म.मि. रजिस्टर क्र. 53/2026 अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

बेपत्ता तरुणीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे: उंची सुमारे 4.5 फूट, रंग गोरा, अंगाने सडपातळ, नाक सरळ, डोळे काळे, केस लांब व काळे, चेहरा उभट. ती अंगात पांढऱ्या रंगाची फ्रॉक परिधान केलेली होती. ती हिंदी व भोजपुरी भाषा बोलते.

या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग घागरे करीत असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली शोधकार्य सुरू आहे.दरम्यान, संबंधित तरुणीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ खांदेश्वर पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# गुडब्रिक रियालिटी कंपनीची यशस्वीरित्या पाच वर्षे पूर्ण; बांधकाम क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** बांधकाम क्षेत्रात अल्पावधीत विश्वासार्हता आणि उच्च दर्जाच्या गुणवत्तेच्या जोरावर स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या गुड ब्रिक रियालिटी कंपनी प्रा. लि. ने यशस्वीपणे पाच वर्षांचा टप्पा पूर्ण केला आहे. १ एप्रिल रोजी कंपनीचा पाचवा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

गेल्या पाच वर्षांमध्ये नवी मुंबईसह विविध शहरांमध्ये दर्जेदार प्रकल्प राबवत कंपनीने ग्राहकांचा भक्कम विश्वास संपादन केला आहे. कंपनीचे मार्गदर्शक संदीप सर आणि व्यवस्थापकीय संचालक (MD) स्नेह सर यांच्या कुशल नेतृत्वाखाली अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आहेत.

वर्धापन दिनानिमित्त कंपनीत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी कर्मचाऱ्यांसाठी फनी गेम्स घेण्यात आले, ज्यामध्ये सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यानंतर केक कापून वर्धापन दिन जल्लोषात साजरा करण्यात आला. तसेच रहेजा कंपनीच्या स्टेडियमवर क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विजयी ठरलेल्या संघाला कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांच्या



हस्ते बक्षीस प्रदान करण्यात आले. या सर्व कार्यक्रमांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

लोणावळा येथील Vogue 25, Palazio आणि Skyfinity हे प्रीमियम प्रकल्प तसेच नाशिकमधील Vistara प्रकल्प कंपनीच्या दर्जेदार कामगिरीची साक्ष देतात. या प्रकल्पांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान, आकर्षक डिझाइन आणि उच्च दर्जाच्या बांधकामाचा उत्कृष्ट संगम पाहायला मिळतो.

नवी मुंबई, लोणावळा, नाशिक आणि खंडाळा या ठिकाणी यशस्वीपणे प्रकल्प पूर्ण करत कंपनीने केवळ आपला विस्तार साधला नाही, तर बांधकाम क्षेत्रात उच्चांकही गाठला आहे. ग्राहक समाधान, वेळेवर प्रकल्प पूर्ण करणे आणि दर्जेदार सेवा देणे ही कंपनीची ओळख ठरली आहे.

पुढील काळात अधिक नाविन्यपूर्ण व ग्राहककेंद्री प्रकल्प साकारण्याचा कंपनीचा मानस असून, बांधकाम क्षेत्रात नवे मापदंड निर्माण करण्यासाठी गुड ब्रिक रियालिटी कंपनी कटिबद्ध असल्याचे यावेळी सांगण्यात आले.कंपनीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध स्तरांतून कौतुक होत असून, भविष्यातही अशीच प्रगती सुरू राहो, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# वैष्णव गॅस एजन्सीच्या मनमानी कारभाराविरोधात नागरिकांचा संताप; आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** वांद्रे पूर्व परिसरातील निर्मल नगर येथे गॅस सिलेंडर वितरणात होत असलेल्या अनियमितता आणि भोंगळ कारभाराविरोधात नागरिकांचा संताप उफाळून आला आहे. माजी नगरसेवक श्री. चंद्रशेखर वासुदेव वायंगणकर यांच्या नेतृत्वाखाली शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ रोजी वैष्णव गॅस एजन्सीविरोधात जोरदार निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी निर्मल नगर पोलीस ठाणे तसेच वैष्णव गॅस एजन्सीच्या संचालिका श्रीमती जयश्री कावळे यांना निवेदन देण्यात आले. नागरिकांना गॅस सिलेंडर वितरणात होत असलेल्या त्रासाची




सविस्तर माहिती देत, तात्काळ सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी वायंगणकर यांनी स्पष्ट इशारा दिला की, जर नागरिकांना कायदेशीर पद्धतीने आणि वेळेत गॅस सिलेंडर पुरवठा झाला नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. तसेच संबंधितांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यासही मागेपुढे पाहिले जाणार नाही, असे त्यांनी सांगितले.

या आंदोलनात माजी शाखाप्रमुख श्री. वसंत गावडे, एकनाथ गावडे, बाळा कतवनकर, गोरख मोरे, सतीश गावडे, मारुती शिंदे, रवींद्र दळवी, सुरेंद्र गाडेकर, अण्णा घाडीगावकर, किशोर पारडे, मझहर देशमुख, विनोद गायकवाड, चंद्रकांत धुरी, पार्सेकर, बालाजी किनगे आदी कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नागरिकांच्या दैनंदिन गरजेशी संबंधित असलेल्या गॅस वितरण व्यवस्थेतील त्रुटी तातडीने दूर करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

# नरेश गेडाम यांची 'अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद' नवी दिल्लीच्या केंद्रीय सदस्यपदी निवड

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी/ राजू गायकवाड (मोहदरी) :** यवतमाळ जिल्ह्याचे भूमिपुत्र आणि आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारे तडफदार नेतृत्व नरेश गेडाम यांची अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, नवी दिल्लीच्या केंद्रीय सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे यवतमाळ जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, संपूर्ण जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

नरेश गेडाम यांनी अतिशय सामान्य परिस्थितीतून येत समाजकार्यात आपली



वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांची कामाची पद्धत, स्पष्टवक्तेपणा आणि गरिबांच्या प्रश्नांची जाण यामुळे ते सर्वसामान्यांमध्ये लोकप्रिय आहेत. मग तो विद्यार्थी असो वा सामान्य आदिवासी नागरिक, त्यांच्या समस्यांसाठी नरेश गेडाम यांनी वेळोवेळी आमदार, खासदार, मंत्री आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना धारेवर धरून समाजाला न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे.

अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले उल्लेखनीय कार्य लक्षात घेऊन, नवी दिल्ली येथील 'हाय कमांड'ने त्यांची ही नियुक्ती केली आहे. या निवडीसाठी श्री. घनश्याम मडावी आणि श्री. सचिन पालरक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.


# पौराणिक आणि ऐतिहासिक पानांवर; सुवर्णाक्षरांनी कोरलेला द्रोणागिरी किल्ला विक्रीचा डाव?

## ऐतिहासिक वारसा विक्रीचा विचार म्हणजे महाराष्ट्राच्या स्वाभिमानावर आघात

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी:** उरण बस स्थानकासमोरील द्रोणागिरी डोंगराराच्या माथ्यावर उभा असलेला ऐतिहासिक द्रोणागिरी किल्ला आता थेट 'विक्रीच्या बोलीत' निघाल्याची चर्चा रंगू लागली असून, यामागे नेमका कोणाचा हात आहे? असा संतप्त सवाल उरणकरांनी उपस्थित केला आहे.

इतिहासाच्या पानांवर सुवर्णाक्षरांनी कोरलेला हा किल्ला केवळ एक वास्तू नाही, तर उरणच्या अस्मितेचा कणा आहे! देवगिरीच्या यादवांपासून ते पोर्तुगीज, आदिलशहा आणि इंग्रजांच्या सत्तेला साक्षी असलेला हा गड 10 मार्च 1739 रोजी मानाजी आंग्रे यांनी जिंकून स्वराज्याच्या इतिहासात भर घातली होती. इतकंच नाही, तर पौराणिक मान्यतेनुसार भगवान हनुमान संजीवनी बुटीचा पर्वत घेऊन जात असताना त्यातील काही अंश येथे पडले, म्हणून हा द्रोणागिरी डोंगर पवित्र मानला जातो. अशा धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचा ठेवा असलेली ही भूमी आज विक्रीच्या चर्चेत येणं म्हणजे महाराष्ट्राच्या स्वाभिमानावर थेट आघात असल्याची भावना व्यक्त होत आहे.



मात्र, या सर्व गंभीर पारर्श्वभूमीवरही प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची संशयास्पद शांतता नागरिकांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे. इतिहास विकून पैसा कमावण्याचा उद्योग सुरू आहे का? असा थेट सवाल आता उघडपणे विचारला जात आहे.स्थानिकांच्या मते, किल्ल्याच्या जागेची विक्री ही साधी बाब नसून, यामागे मोठ्या आर्थिक व्यवहाराचे षड्यंत्र आहे. त्यामुळेच संबंधित अधिकारी आणि नेते मंडळी हाताची घडी तोंडावर बोट ठेऊन गप्प बसल्याचा आरोप केला जात आहे. द्रोणागिरी किल्ला हा कोणाच्या बापाची मालमत्ता नाही!

हा आमच्या इतिहासाचा आणि श्रद्धेचा भाग आहे. जर या किल्ल्याच्या विक्रीचा प्रयत्न झाला, तर उरणची जनता रस्त्यावर उतरेल आणि उग्र आंदोलन उभं राहील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# सोयगावच्या चि .निरज पाटीलचा सीबीएसई दहावीमध्ये झळकला ; जैन इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रथम

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव येथील विद्यार्थी चि.निरज किरणकुमार पाटील याने सीबीएसई दहावी बोर्ड परीक्षेत ९६.२०% गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जामनेर येथील जैन इंटरनॅशनल स्कूलमध्ये तो प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे.निरजच्या या यशामागे त्याची कठोर मेहनत, जिद्द आणि चिकाटी यांसोबतच शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरल्याचे त्याच्या पालकांनी सांगितले.निरजच्या या यशाबद्दल गिरीषभाऊ महाजन, जामनेर शहराच्या नगराध्यक्षा साधनाताई महाजन, माजी उपनगराध्यक्ष प्रा. शरद पाटील,जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे,सोयगाव केंद्राचे प्रमुख फिरोज तडवी तसेच प्रा. अनिल मानकर आणि सोयगाव येथील शिक्षकवर्गाने त्याचे अभिनंदन केले आहे.

प्रतिक्रिया (किरण पाटील):



"चि.निरजने मिळवलेले यश हे त्याच्या अथक परिश्रमाचे फलित आहे. त्याने सातत्याने अभ्यासावर लक्ष केंद्रित केले आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा योग्य उपयोग केला. आम्हाला त्याचा खूप अभिमान आहे. पुढील वाटचालीसाठी त्याला मनःपूर्वक शुभेच्छा."

# आदई हिलवर हरित क्रांती ; नागरिकांच्या वर्गणीतून कायमस्वरूपी बंधाऱ्यांची उभारणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने आदई हिल येथे सुरू झालेल्या वृक्षारोपण मोहिमेला स्थानिक नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून गेल्या काही वर्षांत या उपक्रमाने हरित चळवळीचे रूप धारण केले आहे. मेजर किसन बोराटे व त्यांच्या बिल्डिंगमधील सहकाऱ्यांनी 2013 साली या मोहिमेची सुरुवात केली होती.

कोरोना काळात या उपक्रमाला अधिक बळ मिळाले. पनवेल ट्रेकर्स, हिरवाई ग्रुप, आगरी कोळी डॉक्टर्स ग्रुप, संवेदना चॅरिटेबल ट्रस्ट यांसारख्या विविध सामाजिक संस्थांनी यात सक्रिय सहभाग नोंदवला. परिणामी, आजपर्यंत 10 हजारांहून अधिक झाडे लावण्यात यश आले आहे.

वृक्षांना पाणीपुरवठा करण्यासाठी पूर्वी मातीचे बंधारे बांधले जात होते; मात्र ते पावसाळ्यात वाहून जात असल्याने



कायमस्वरूपी उपायाची गरज भासू लागली. यासाठी श्री अरुण रोकडे, श्री नितीन वाघमारे आणि श्री संतोष टकले यांनी पुढाकार घेत दोन सिमेंट काँक्रिटचे मजबूत बंधारे उभारले. या कामासाठी नागरिकांनी लोकवर्गणी जमा करून सुमारे 3.75 लाख रुपये खर्च केला.या उपक्रमात उत्तम ढेबे, लक्ष्मण तळेकर, श्री हातिसकर, मनोज म्हात्रे, रवि शेळके, हरिश शेळके, ॲड. नागेश हिरवे, रविंद्र गोविंद यांसह अनेक सहकाऱ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मोलाचे योगदान दिले. तसेच आदई गावातील ग्रामस्थांचेही विशेष सहकार्य लाभले. ग्रामपंचायतीतर्फे 500 किलो स्टील व सेंट्रिंग साहित्य उपलब्ध करून देण्यात आले.

# वाढदिवस ठरणार महिलांसाठी संधीचा महोत्सव! – क्रांतिज्योत Power Expo 2026 पनवेलमध्ये धुमाकूळ घालणार"

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या क्रांतिज्योत महिला विकास फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौ. रुपालीताई शिंदे यांचा वाढदिवस यंदा आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा होणार आहे. केवळ वाढदिवसापुरता मर्यादित न ठेवता, महिलांना सशक्त बनवण्याच्या उद्देशाने एक भव्य उपक्रम राबवण्यात येत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून रुपालीताई शिंदे या तळागाळातील महिलांसाठी सातत्याने कार्यरत असून, त्यांच्या फाउंडेशनच्या माध्यमातून अनेक महिलांना स्वावलंबनाचा मार्ग मिळाला आहे. महिलांना न्याय, संधी आणि आत्मविश्वास देण्याचे कार्य त्यांनी प्रभावीपणे उभे केले आहे.




याच पार्श्वभूमीवर बुधवार, २२ एप्रिल २०२६ रोजी त्यांच्या वाढदिवसानिमित्त "क्रांतिज्योत Power Expo 2026" या भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा एक्सपो महिलांसाठी एक सुवर्णसंधी ठरणार असून, स्वतः तयार केलेल्या वस्तू, कला आणि व्यवसायाचे प्रदर्शन व विक्री करण्यासाठी महिलांना मोठं व्यासपीठ मिळणार आहे.

या एक्सपोमध्ये:

# महिलांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री

# खाद्यपदार्थांचा खास स्टॉल

#महिला उद्योजिकांसाठी नेटवर्किंग संधी

# विविध क्षेत्रातील नामांकित महिलांचा सन्मान

# नवनिर्वाचित नगरसेविकांचा गौरव

अशा विविध उपक्रमांचा समावेश असणार आहे.

पत्रकारिता क्षेत्रातही सक्रिय असलेल्या रुपालीताई शिंदे यांनी अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडत गरजूंपर्यंत मदत पोहोचवली आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून या दिवशी अनेक यशस्वी महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे.

कार्यक्रम तपशील

दिनांक: बुधवार, २२ एप्रिल २०२६

वेळ: सकाळी १० ते रात्री ९

सन्मान व पुरस्कार सोहळा सकाळी 10:30 ते 11:30

ठिकाण: कालीमाता हॉल, सेक्टर १३, न्यु पनवेल

सर्व नागरिकांनी उपस्थित राहून महिलांच्या कलाकृतींना प्रोत्साहन द्यावे आणि खरेदी करून त्यांना साथ द्यावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी निधी मंजुरीची मागणी ; मंत्री गिरीश महाजन यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव तालुक्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे घोसला, तिडका, बोरमाळ तांडा, नांदगाव आदी गावांतील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.अनेक शेतकऱ्यांची जमीन खरडून गेल्याने ते आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी आणि पुरवणी यादी तात्काळ मंजूर करावी, या मागणीसाठी जिल्हा परिषद सदस्या सौ. पुष्पाताई काळे यांनी पुढाकार घेतला.या संदर्भात जामनेर येथे आपत्ती व्यवस्थापन मंत्री ना. गिरीश भाऊ महाजन यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर करण्यात आले. तसेच आमखेडा गाव व सोयगाव शहरातून वाहणाऱ्या सोनानदीवर संरक्षणभिंत उभारण्याचीही मागणी करण्यात आली, जेणेकरून भविष्यात होणाऱ्या पूरस्थितीत गावांचे संरक्षण होईल.मंत्री महाजन यांनी सविस्तर माहिती घेत संबंधित मागण्यांवर त्वरित कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.यावेळी तेजस्विनी ताई काळे (जिल्हा चिटणीस), सुनील



गावंडे, नगरसेवक राजेंद्र जावळे, मयूर मनगटे, प्रमोद पाटील (शहराध्यक्ष), मंगेश सोहनी, सरपंच संजय आगे, विजय भाऊ गव्हाड तसेच घोसला येथील किशोर पाटील, समाधान पाटील आदी उपस्थित होते.

## शंभुप्रेमींच्या ४ वर्षांच्या पाठपुराव्याला यश; जिल्हा परिषदेत स्मारकांच्या उभारणीला वेग:- डॉ.गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी):** बीड जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या परिसरात महापुरुष आणि लोकनेत्यांच्या पुतळ्यांच्या उभारणीसाठी हालचालींना अखेर वेग आला आहे. मुंबईतील नामांकित शिल्पकारांकडून तातडीने कोटेशन मागविण्यात आले असून, गेल्या चार वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या शंभुप्रेमींच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे. जिल्हा नियोजन अर्थसंकल्पात या स्मारकांसाठी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असली, तरी ही रक्कम अपुरी असल्याचे सांगत अधिक निधी उपलब्ध करून देऊन रखडलेली कामे




तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी डॉ.गणेश ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे. नवीन प्रशासकीय इमारतीसमोर महापुरुषांची स्मारके उभारल्याशिवाय लोकार्पण होऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका शंभुप्रेमींनी घेतली होती. या नंतर तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी १९ मार्च २०२२ रोजी छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याचे भूमिपूजन करून काम सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात चार वर्षे कोणती ही कामे झाली नाहीत. डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली शंभुप्रेमींनी सातत्याने निवेदने व आंदोलनांद्वारे पाठपुरावा सुरू ठेवला. अखेर जिल्हा परिषद बांधकाम विभागाने मुंबईतील प्रख्यात शिल्पकार राजेंद्र शिरगावकर (विघ्नेश्वर आर्ट्स) यांना पत्र पाठवून प्रक्रिया सुरू केली आहे. त्या मुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा विषय आता मार्गी लागण्याची चिन्हे दिसत आहेत. जिल्हा परिषदेत एकूण सहा पुतळे उभारण्याचा ठराव पारित करण्यात आला असून त्यामध्ये छत्रपती संभाजी महाराज यांचा १२ फूट उंचीचा भव्य पूर्णाकृती ब्राँझ पुतळा, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रत्येकी ४ फूट अर्धाकृती ब्राँझ पुतळे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा १० फूट पूर्णाकृती पुतळा, लोकनेते सुंदरराव सोळंके यांचा १० फूट पूर्णाकृती पुतळा आंदोलनकर्त्यांनी लोकनेत्या केशरकाकू क्षीरसागर, हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि दिवंगत अजितदादा पवार यांच्या स्मारकांची ही उभारणी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. या निर्णयामुळे आंदोलनात सहभागी असलेले शंभुप्रेमी डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस, रामनाथ खोड, अशोक येडे, शेख मुबीन, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, राहुल वायकर, संजय गोडसे, जयदत्त थोटे, युवराज मस्के, विठ्ठल बहिर, भागवत मस्के, गणेश मस्के, गणेश धोंडरे, राजेंद्र आमटे, नितिन सोनावणे, विजय लाटे सह आदींनी समाधान व्यक्त केले आहे.

## दिलीपराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त देवणीत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी: पांडुरंग कदम** :माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त देवणी तालुक्यात नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटप शिबिराचे आयोजन काँग्रेस तालुका अध्यक्ष अजित बेळकोने यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत पार पडलेल्या या उपक्रमात मोठ्या संख्येने नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. *दैनिक युवक अधिकार* वृत्तपत्रांमध्ये मध्ये वाढदिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन न केल्याची बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर अवघ्या दोन दिवसांत हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याने तो विशेष लक्षवेधी ठरला.

या कार्यक्रमाला डीसीसी बँक संचालक दिलीप पाटील नागराळकर, लातूर जिल्हा




काँग्रेस उपाध्यक्ष मालबा घोणसे तळेगावकर, जिल्हा परिषद सदस्य औदुंबर पांचाळ, देवणी तालुका काँग्रेस सेवा दल अध्यक्ष सुभाष पाटील, तसेच गणेश हॉस्पिटल (निलंगा-उदगीर रोड) व श्री पाटील मेडिकल, देवणी यांचे सहकार्य लाभले. अंबिका नेत्रालय, उदगीर येथील डॉ. प्रवीण देशमुख व त्यांच्या टीमने नेत्र तपासणी करून गरजू रुग्णांना २५० पेक्षा अधिक चष्म्यांचे वितरण केले. तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी २० नागरिकांची नोंदणी करून त्यांना उदयगिरी लाइन्स येथील नेत्र रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले.कार्यक्रमात काँग्रेसचे पदाधिकारी बालाजी बोबडे, बालाजी वळसांगवीकर, वैजनाथ लुले, शरण लुले, काँग्रेस नेते मल्लिकार्जुन आप्पा मानकरी, रामभाऊ भंडारे, अजित बेळकोने, राम बिरादार, सुनील पोतदार, शिवाजी कोठे, नर्सिंग काळे, राम धणेगावे, जावेद तांबोळी आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे पाचरण अजित बेळकोने यांनी केले असून त्यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

## पनवेल मधील जेडब्ल्यूआर लॉजिस्टिक्स हॅझर्डस केमिकल गोदामाला भीषण आग

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : 14 ते 20 एप्रिल हा अग्निशमन सेवा सुरक्षा सप्ताह. सुरु असतानाच पनवेल तालुक्यातील पालेखुर्द परिसरात असलेल्या जेडब्ल्यूआर लॉजिस्टिक्स प्रा. लि. या हॅझर्डस कार्गो कंपनीच्या केमिकल गोदामाला शनिवारी भीषण आग लागल्याने एकच खळबळ उडाली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. जेडब्ल्यूआर लॉजिस्टिक्स परिसरात अनेक लॉजिस्टिक्स व वेअरहाऊस कंपन्या आहेत. आगीचे लोळ व स्फोटाचे आवाज ऐकून परिसरातील कामगार व नागरिकांमध्ये घबराट पसरली. वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी बंदोबस्त वाढवला आहे.

JWR लॉजिस्टिक्स ही कंपनी जेएनपीए बंदरापासून 11 किमी अंतरावर NH-4B वर 97 एकरात पसरलेली आहे. कंपनीकडे कंटेनर फ्रेट स्टेशन, कस्टम बॉन्डेड वेअरहाऊस आणि हॅझर्डस वेअरहाऊस ची सुविधा आहे. शनिवारी दुपारच्या सुमारास कंपनीच्या केमिकल साठवणूक विभागात अचानक आगीचे मोठे लोळ उसळले.



आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले आणि काळ्या धुराचे लोट संपूर्ण परिसरात पसरले. आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. केमिकल रिॲक्शन, शॉर्ट सर्किट की मानवी चूक याबाबत तपास सुरू आहे. आग लागताच गोदामातील कामगारांनी जीव वाचवण्यासाठी एकच धावाधाव केली. सुदैवाने सर्व कामगार वेळीच बाहेर पडल्याने मोठा अनर्थ टळला.

घटनेची माहिती मिळताच पनवेल अग्निशमन दलाच्या 5 ते 6 गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. केमिकलची आग असल्याने अग्निशमन दलाचे जवान प्रयत्नाची शर्थकरून पाण्यासोबत फोमचाही वापर करून आग आटोक्यात आणण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. हॅझर्डस केमिकलमुळे आगीचा भडका वारंवार उडत असल्याने अग्निशमन जवानांना मोठे आव्हान पेलावे लागत आहे. जवळपासच्या कंपन्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

सदरची जेडब्ल्यूआर लॉजिस्टिक्स प्रा. लि. ही भारतातील सर्वात मोठ्या LCL कंटेनर फ्रेट स्टेशनपैकी एक आहे. कंपनी शिपिंग, वेअरहाऊसिंग, इन्व्हेंटरी मॅनेजमेंट आणि धोकादायक मालाची वाहतूक-साठवणूक करते. सध्या आग पूर्णपणे विझवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून कूलिंग ऑपरेशन रात्री उशिरापर्यंत चालणार असल्याची माहिती अग्निशमन दलाने दिली आहे. सुदैवाने जीवितहानी टळल्याने मोठा दिलासा मिळाला आहे, मात्र केमिकल गोदामांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

पनवेल महापालिका व MIDC अग्निशमन दलाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. केमिकल गोदामात फायर सेफ्टीची पुरेशी यंत्रणा होती का, परवाने अद्ययावत होते का, याची चौकशी सुरू करण्यात आली आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पथकही घटनास्थळी पोहोचले असून हवेच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवून आहे. मात्र अजूनही आगीचे कारण स्पष्ट झालेले नाही

## पनवेल मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती समाजोपयोगी कार्यक्रमातून साजरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व दृष्टी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने खांदा कॉलनी पनवेल येथे दिनांक ८ ते १४ एप्रिल या कालावधीत ७०+ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना आयुष्मान भारत वय वंदना आरोग्य योजनेची मोफत नोंदणी करून त्यांना लॅमिनेटेड आयुष्यमान वय वंदना कार्ड वाटप करण्यात आले.दिनांक १२ एप्रिल रोजी मोफत वैद्यकीय शिबिर आयोजित करून शिबिरार्थींची आरोग्य तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. दिनांक १३ एप्रिल रोजी मोफत रोजगार मार्गदर्शन व शासकीय विविध कर्ज



अर्ज नोंदणी मेळावा घेण्यात आला. याप्रसंगी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस किशोर देवधेकर सर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून सामुहिक त्रिसरण, पंचशील बुद्ध वंदना घेण्यात आली यामध्ये किशोर देवधेकर सर यांनी रोजगार मार्गदर्शन केले. व महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे रायगड जिल्हा व्यवस्थापक नरेंद्र साळवी यांनी शासकीय कर्ज योजनेचे मार्गदर्शन केले व प्रत्येकाला कर्ज अर्जाचे वाटप करून अर्ज भरून घेतले.

मेळाव्यास उपस्थित असलेल्यांच्या विविध समस्या व प्रश्नोत्तराचे समाधानकारक उत्तर देण्यात आले.

सदर सदर कार्यक्रम आयुष्यमान किशोर देवधेकर सर अध्यक्ष दृष्टी फाउंडेशन, कार्याध्यक्ष पनवेल विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांच्या माध्यमातून करण्यात आले. याप्रसंगी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे रायगड जिल्हा व्यवस्थापक साळवे साहेब सागर तळे ,प्रज्ञेश, बौद्धजन पंचायत शाखा क्रमांक ७४१ चे अध्यक्ष नथुराम साखरे ,डॉक्टर सुखदेव कांबळे, दृष्टी फाउंडेशन संस्थेच्या सचिव नम्रता देवधेकर, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सदस्य,अर्जुन गवळी, पत्रकार महेंद्र मगाडे आदी प्रमुख उपस्थित होते.

गरजुनी सदर मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला.अशाप्रकारे सामाजहिताच्या उपक्रमातुन डॉ.बाबसाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली.

## प्रशांत भाऊंच्या हस्ते श्रद्धा चुंगडेचा सत्कार ; श्रद्धाला दिला प्रशांत भाऊ राठोड यांनी मोलाचा सल्ला

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर :प्रतिनिधी /सय्यद ईसा** : माहूर तालुक्यातील पुनर्वसीत जुन्या लिंबायत गावातील श्रद्धा चुंगडे हिची वर्धा पोलिसात निवड झाल्याने मंत्रालयीन सनदी अधिकारी प्रशांत भाऊ राठोड यांनी रस्ता नसलेल्या जुन्या लिंबायत येथे तिच्या घरी जाऊन दि 18 रोजी आई-वडिल नातेवाईक मान्यवरांच्या उपस्थितीत हृदय सत्कार करून बेटा आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अधिकारी बन असा मोलाचा सल्ला देऊन आशीर्वाद दिले

मौजे जुने लिंबायात हे पुनर्वसित गाव असल्याने येथे शासकीय कुठली सुविधा नाही विद्युत पुरवठा राहत नाही रस्ता नाही विहिरीतील पाणी पिऊन शिक्षणाची आवड असल्याने तिने माहूर सह इतर ठिकाणी शिक्षण घेऊन पोलीस भरतीत नशीब आजमावल्याने तिची निवड वर्धा पोलिसात झाली ही आनंद वार्ता कळताच मोजे जुने लिंबायत येथे आप्तस्वकीय गावकऱ्यांनी



तिचा हृदय सत्कार करून अभिनंदन केले निवडीची वार्ता मंत्रालयीन सनदी अधिकारी प्रशांत भाऊ राठोड यांना कळाल्याने मौजे जुने लिंबायत गाठून श्रद्धा युवराज सिंह चुंगडे हिचा आई-वडील नातलग गावकऱ्या समक्ष हृदय सत्कार केला

यावेळी प्रशांत भाऊ राठोड यांचे सह पत्रकार इलियास बावाणी श्री दत्तकृपा प्रतिष्ठानचे संचालक विजय भाऊ कांबळे श्रद्धा चुंगडे युवराज सिंह चुंगडे रामाजी जाधव प्रकाश ताटू उपसरपंच सुनील चुंगडे दिलेर चुंगडे सुरेंद्र चुंगडे बंटी चुंगडे प्रकाश चुंगडे लक्ष्मण कऱ्हाळे रितेश चुंगडे यश चुंगडे दिनेश पवार बंडू राठोड प्रदीप पवार करण गेडाम यांचे सह मान्यवर उपस्थित होते.

## निफाड तालुक्यात जिल्हा वार्षिक योजना– क्रीडांगणाचा/व्यायामशाळा विकास अंतर्गत 1 कोटी 64 लक्ष निधी मंजूर - आमदार दिलीपराव बनकर

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : जिल्हा वार्षिक योजनेच्या लेखाशीर्ष क्रीडांगणाचा/व्यायामशाळा विकास अंतर्गत निफाड तालुक्यातील शाळा, ग्रामपंचायतीसाठी सुमारे १ कोटी ६४ लक्ष निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार दिलीपराव बनकर यांनी दिली. यामध्ये जवळपास २८ शाळा, विद्यालय व ग्रामपंचायतीच्या ठिकाणी क्रीडा साहित्य, खुले व्यायाम साहित्य, इनडोअर व्यायाम साहित्य, खेळांची मैदाने तयार करणे, क्रीडांगणावर भांडारगृह बांधणे, क्रीडांगणावर प्रसाधनगृह बांधणे आदी कामांचा समावेश आहे. यात जिल्हा परिषद, डोंगरवाडी



(दारणासांगवी) येथे क्रीडांगणास तारेचे कुंपन करणे. (रक्कम रु.७ लक्ष), ग्रामपंचायत पिंपळस रामाचे येथे इनडोअर जिम साहित्य पुरविणे. (रक्कम रु.७ लक्ष), ग्रामपंचायत शिवडी येथे खुले व्यायाम साहित्य पुरविणे. (रक्कम रु.७ लक्ष), ग्रामपंचायत खेडे – हिंगलाज नगर येथे खुले व्यायाम साहित्य पुरविणे. (रक्कम रु.७ लक्ष), स्वामी विवेकानंद विद्यालय, कुंदेवाडी (गिताकुंज) येथे क्रीडा साहित्य पुरविणे. (रक्कम रु.३ लक्ष), कसबे सुकेणे ग्रामपंचायत येथे इनडोअर जिम साहित्य पुरविणे. (रक्कम रु.७ लक्ष), जिव्हाळे ग्रामपंचायत येथे इनडोअर व्यायाम साहित्य पुरविणे. (रक्कम रु.७ लक्ष), म्हाळसाकोरे ग्रामपंचायत येथे इनडोअर व्यायाम साहित्य पुरविणे. (रक्कम रु.७ लक्ष), शिंगवे ग्रामपंचायत येथे इनडोअर व्यायाम साहित्य पुरविणे. (रक्कम रु.७ लक्ष), कसबे सुकेणे ग्रामपंचायत (जि.प.प्राथ.शाळा) येथे खुले मैदानावरील साहित्य पुरविणे. (रक्कम रु.६ लक्ष), वडाळी नजिक ग्रामपंचायत येथे खुले मैदानावरील साहित्य पुरविणे. (रक्कम रु.६ लक्ष), शिंपीटाकळी ग्रामपंचायत येथे खुले मैदानावरील साहित्य पुरविणे. (रक्कम रु.७ लक्ष), सोनगाव ग्रामपंचायत येथे इनडोअर व्यायाम साहित्य पुरविणे. (रक्कम रु.५ लक्ष), औरंगपुर ग्रामपंचायत येथे प्रमाणित खेळांची मैदाने तयार करणे. (रक्कम रु.७ लक्ष), सामोरे ग्रामविकास मंडळ संचलित माधवराव बोरस्ते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे क्रीडा साहित्य पुरविणे. (रक्कम रु.३ लक्ष), सायखेडा ग्रामपंचायत (नरसिंग मंदिर परिसर) येथे खुले मैदानावरील साहित्य पुरविणे. (रक्कम रु.७ लक्ष), सायखेडा ग्रामपंचायत (शिक्षक कॉलनी) येथे खुले मैदानावरील साहित्य पुरविणे. (रक्कम रु.७ लक्ष), निफाड तालुका एज्युकेशन सोसायटीचे कै.मा.ल.तथा नानासाहेब जाधव कन्या विद्यालय, पिंपळगाव बसवंत येथे क्रीडांगणावर भांडारगृह बांधणे. (रक्कम रु.७ लक्ष), पंचक्रोशी ज्ञानविकास मंडळ संचलित श्रीमती अनुसयाबाई भालेराव माध्यमिक विद्यालय, वऱ्हेदारणा येथे विविध खेळांची मैदाने तयार करणे. (रक्कम रु.७ लक्ष), महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे न्यू.इंग्लिश स्कूल, पालखेड येथे क्रीडांगणावर प्रसाधनगृह बांधणे. (रक्कम रु.७ लक्ष), आरूढ माध्यमिक विद्यालय, म्हाळसाकोरे येथे क्रीडा साहित्य पुरविणे. (रक्कम रु.३ लक्ष), कर्मवीर ॲड विठ्ठलराव हांडे जनता विद्यालय, चाटोरी येथे क्रिडा साहित्य पुरविणे. (रक्कम रु.३ लक्ष), कर्मवीर रावसाहेब थोरात हायस्कूल, मौजे सुकेणे येथे क्रिडा साहित्य पुरविणे. (रक्कम रु.३ लक्ष), कविवर्य कुसुमाग्रज विद्यालय, शिरवाडे वणी येथे क्रिडा साहित्य पुरविणे. (रक्कम रु.३ लक्ष), जनता इंग्लिश स्कूल, सायखेडा येथे क्रिडा साहित्य पुरविणे. (रक्कम रु.३ लक्ष), जनता विद्यालय, आहेरगाव येथे क्रिडा साहित्य पुरविणे. (रक्कम रु.२ लक्ष), जनता विद्यालय, तामसवाडी येथे क्रिडा साहित्य पुरविणे. (रक्कम रु.३ लक्ष), जनता विद्यालय, दात्याणे येथे क्रिडा साहित्य पुरविणे. (रक्कम रु.३ लक्ष), जनता विद्यालय, धारणगाव खडक येथे क्रिडा साहित्य पुरविणे. (रक्कम रु.२ लक्ष), जनता विद्यालय, नांदूर्डी येथे क्रिडा साहित्य पुरविणे. (रक्कम रु.३ लक्ष), जनता विद्यालय, नैताळे येथे क्रिडा साहित्य पुरविणे. (रक्कम रु.३ लक्ष), जनता विद्यालय, पिंपळगाव बसवंत येथे क्रिडा साहित्य पुरविणे. (रक्कम रु.३ लक्ष), जनता विद्यालय, रामनगर येथे क्रिडा साहित्य पुरविणे. (रक्कम रु.२ लक्ष) याप्रमाणे निधी प्राप्त झालेला असून सदर कामे मंजुरी करिता सहकार्य केल्याबद्दल मा.जिल्हाधिकारी साहेब व सबंधित अधिकारी यांचे निफाड तालुक्यातील जनतेच्या वतीने आमदार दिलीपराव बनकर यांनी आभार मानले.

# आ.सुरेश धस यांच्या हस्तक्षेपामुळे पाटोद्यात प्रक्रियेत सुलभता, जन्म-मृत्यू नोंदणीला आली गती

## प्रशासनाकडून दोन महिन्यांत ५१ जन्म व ०३ मृत्यूच्या नोंदणीचे आदेश पारित

**दैनिक युवक आधार**
**शेख महेशर ताहेर, पाटोदा (प्रतिनिधी) :** तालुक्यातील जन्म, मृत्यूच्या नोंदणी प्रकरणात आता सुनावणी घेण्याचे प्रमाण वाढविण्यात आले असून या मुळे कागदपत्रांची पडताळणी होताच सुनावणीनंतर लगेच आदेश पारित होत आहेत. या मुळे प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी झाली असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. शासनाने जन्म-मृत्यू नोंदणीची प्रकरणे न्यायालयाकडून महसूल विभागाकडे वर्ग केले. परंतु कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार असल्यामुळे सदरील कामकाजास विलंब होत होता. त्या मुळे जन्म, मृत्यूच्या नोंदणीसाठी दोन ते तीन महिने प्रतीक्षा करावी लागत होती. महसूल विभागाकडून सदरील प्रक्रियेसाठी गुंतागुंतीचे



निकष लावले होते. दरम्यान ॲड.महेश बेदरे, ॲड.रवींद्र आवटे, ॲड.जब्बार पठाण, ॲड.तळेकर यांनी आष्टी/पाटोदा /शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांच्या कडे या संदर्भात तक्रार केली. त्या वर आमदार सुरेश धस यांनी तातडीने प्रशासनाने या संदर्भात लवकरात लवकर तोडगा काढुन नागरिकांची जन्म-मृत्यूची प्रलंबित प्रकरणी निकाली काढावेत अशा सुचना दिल्या. या मुळे प्रशासनाने आमदार धस यांच्या सूचनांनुसार प्रक्रियेला गती दिली. त्याच प्रमाणे गुंतागुतीचे निकष कमी करून प्रक्रिया सोपी केली. विशेषत: जन्म मृत्यूच्या नोंदणी संदर्भातील सुनावण्यांची संख्या प्रशासनाने वाढवली. या मुळे या प्रक्रियेला गती आली आहे. ०१ फेब्रुवारी-२०२६ ते १६ एप्रिल-२०२६ या कालावधीत म्हणजेच अवघ्या दिड ते दोन महिन्यांच्या कालावधीत ५१ जन्म नोंदी तर ०३ मृत्यूच्या नोंदणीचे आदेश प्रशासनाने पारित केले आहेत. या प्रक्रियेत तहसीलदार दत्तात्रय निलावाड तसेच महसूल सहाय्यक वैशाली जाधव मॅडम यांनी प्रभावी कामकाज करत नागरिकांना दिलासा देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**प्रक्रिया पारदर्शक आणि गतिमान झाली आहे**
ज्या प्रकरणांमध्ये आवश्यक व योग्य कागदपत्रे सादर केली जातात, त्यांना तातडीने आदेश दिले जात आहेत. कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास संबंधित वकील व अर्जदारांना नोटीसद्वारे वेळोवेळी कळविले जाते तसेच सुनावण्या देखील घेतल्या जात आहेत. त्या मुळे प्रक्रिया आता अधिक पारदर्शक व गतीमान झाली असून नागरिकांना कोणत्याही अडचणी येणार नाहीत.
**दत्तात्रय निलावाड,**
**तहसीलदार, पाटोदा**

**प्रक्रिया सोपी झाल्याने दिलासा...**
जन्म नोंदणी आदेशासाठी खूप अडचणी येत होत्या. अनेक वेळा कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत होत्या. मात्र आता प्रक्रिया सोपी झाली असून आम्हाला वेळेत आदेश प्राप्त झाले आहे. या साठी आमदार सुरेश आण्णा धस व प्रशासनाचे मनापासून आभार...
**फरीदा शेख (पाटोदा)**
**जन्म नोंदणी आदेश लाभार्थी**

गुरुवारी पाटोदा येथील शेख महेशर व फरीदा शेख यांच्या जन्म नोंदणी आदेशाची प्रत तहसीलदार दत्तात्रय निलावाड व वैशाली जाधव यांच्या हस्ते देण्यात आली. या वेळी आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, पत्रकार संघाचे सचिव ॲड.महेश बेदरे सह आदी जण उपस्थित होते.

# तळोजा मध्यवर्ती कारागृहात कैद्यावर हल्ला

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी :** तळोजा मध्यवर्ती कारागृहात दोन कैद्यांमध्ये झालेल्या वादातून एका कैद्यावर दुसऱ्या कैद्याने हल्ला केल्याची घटना घडली. यात एका कैद्याने दुसऱ्याच्या तोंडावर ठोसा लगावल्याने त्याचा दात पडला आणि तो कैदि जखमी झाला. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात मारहाण करणाऱ्या कैद्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.अल्तमश युसुफ शेख आणि मुबीन कादर शेख हे एका बँकेमध्ये शिक्षा भोगत आहेत. 15 एप्रिल रोजी सकाळच्या सुमारास आरोपी मुबीन याने अल्तमश यांच्याकडे दहा हजार रुपयांची मागणी केली. ही रक्कम त्याच्या बहिणीच्या नावे चिठ्ठी लिहून बाहेर पाठवण्यास आणि गुगल पे द्वारे मागवण्यास सांगितले. अल्तमशने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपी मुबीन याने त्याला शिवीगाळ केली आणि दोघांमध्ये वाद झाले. यावेळी आरोपीने अल्तमशच्या पोटावर व कानाखाली जोरात ठोसे लगावले. एक ठोसा त्याच्या तोंडावर बसल्याने उजव्या बाजूच्या जबड्यातील दात तुटून पडला. या मारहाणीत अल्तमश गंभीर जखमी झाला. आणि त्याच्या तोंडातून रक्तस्त्राव झाला. त्याला तातडीने कारागृहातील रुग्णालयात औषधोपचारासाठी नेले. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात आरोपी मुबीन कादर शेख याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# धारदार शस्त्राने भोसकल्या प्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :** भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या तीस वर्षीय तरुणाला धारदार शस्त्राने भोसकून जखमी केल्याप्रकरणी तिघां विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 14 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.तन्मय शेजवळ हे करंजाडे येथे राहत असून ते सोसायटीमध्ये असताना खेमचंद आणि दिनेश चौगुले यांच्यात वाद सुरू होता. दिनेश चौगुले याने त्यांच्या हेल्मेट फेकून मारले. यावेळी तन्मय आणि त्यांची होणारी पत्नी भांडण सोडवण्यासाठी गेले. त्यावेळी दिनेश चौगुले याने त्यांच्या पत्नीला केसांना ओढून बाजूला केले आणि दिनेश याच्यासोबत असलेल्या दोन महिलांनी त्यांच्या होणाऱ्या पत्नीला हाता बुक्क्याने मारहाण केली. यावेळी होणाऱ्या पत्नीला वाचवण्यासाठी गेले असता दिनेश चौगुले याने धारदार शस्त्राने तन्मय यांना भोसकले. यात तन्मय जखमी झाला. त्यानंतर त्याला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. त्यावेळी दिनेश चौगुले याने हॉस्पिटलला येऊन त्याच्या आईला बघून घेण्याची धमकी दिली. पनवेल शहर पोलिसांनी यातील आरोपी दिनेश चौगुले याला अटक केली.

# सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी राहुल दवते यांना बाळासाहेब ठाकरे गुणवंत शिक्षक पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित पालखेड येथील न्यू इंग्लिश स्कूल, ता. निफाड येथील उपक्रमशील शिक्षक राहुल रामदास दवते यांना "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे गुणवंत शिक्षक पुरस्कार २०२६" प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सामाजिक, शैक्षणिक व संघटनात्मक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा पुरस्कार नाशिक येथील रावसाहेब थोरात सभागृहात आयोजित भव्य समारंभात प्रदान करण्यात आला.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास दिंडोरी लोकसभेचे खासदार भास्करराव भगरे, शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, मविप्र संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, संगमनेरच्या माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे, महाराष्ट्र समाज सेवा संघाचे अध्यक्ष सुधाकर साळी तसेच निवड समितीचे अध्यक्ष व शिक्षक नेते शिवाजीराव निरगुडे आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते दवते यांना सन्मानचिन्ह, मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. यावेळी व्यासपीठावर नगरसेवक



साहेबराव बर्डे, कार्याध्यक्ष साहेबराव कुटे, सदस्य अरुण पवार, बाळासाहेब ढोबळे, निंबा कापडणीस, विनीत पवार, दादाजी अहिरे, संजय पाटील, बाळासाहेब भोसले, एनडीएसटी ॲंड एनटी सोसायटीच्या अध्यक्षा विजया पाटील, उपाध्यक्ष संग्राम करंजकर, समीर जाधव, प्राचार्य किशोर जाधव, नाना खैरनार, रामदास गडकरी, कल्पेश चव्हाण, संजय पवार, निलेश ठाकूर, रघुनाथ गायकवाड, एन. डी. मुसळे, लक्ष्मण मुसळे आदी मान्यवर उपस्थित होते.

राहुल दवते यांनी शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले असून शिक्षण क्षेत्रात नाविन्यपूर्ण प्रयोगांद्वारे त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे.

याशिवाय सामाजिक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग असून वाचन संस्कृती वाढीसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. निफाड येथील तब्बल १०६ वर्षांची परंपरा लाभलेल्या श्री माणकेश्वर वाचनालयात ते सहचिटणीस म्हणून कार्यरत असून वाचन चळवळीला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबवत आहेत.

तसेच निफाड तालुका माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्थेत कार्यवाह म्हणून त्यांनी संघटनात्मक जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. पत्रकारितेच्या माध्यमातून स्थानिक प्रश्न, प्रलंबित समस्या व जनतेच्या अडचणींना वाचा फोडून त्यांनी समाजोपयोगी कार्यात मोलाचे योगदान दिले आहे.

पुरस्कार वितरण सोहळ्यावेळी कैलास भारती, मुख्याध्यापक अशोक शेळके, संजय लव्हंगडे, डॉ. साई बागडे, डॉ. महेश बनकर, बाबा गुंजाळ, हेमंत खैरनार, भगीरथ सोनवणे, सुनील होळकर, संदीप निगळ, विशाल निगळ आदी मान्यवर उपस्थित होते.

राहुल दवते यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक तसेच पत्रकारिता क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत असून त्यांच्या कार्याबद्दल सर्वत्र कौतुक व्यक्त केले जात आहे.

# महिलांना कृषी क्षेत्रात नेतृत्व मिळवून देण्यासाठी मोठी गुंतवणूक; दिशा उपक्रमाद्वारे करिअरच्या संधी उपलब्ध करुन देणार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** अन्न आणि कृषी क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या गोदरेज अॅग्रोव्हेट लिमिटेड कंपनीने नेहमीच संशोधन आणि विकासावर भर दिला आहे. नुकतेच गोदरेज अॅग्रोव्हेट कंपनीने वुमन इन अॅग्रीकल्चर समिटच्या तिस-या आवृत्तीमध्ये नव्या कार्यक्रमाची घोषणा केली आहे. कंपनीकडून 'दिशा' या नावाने महिला करिअर प्रवेगक कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. कृषी क्षेत्रामध्ये सर्वसमावेशक आणि भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज असलेली टॅलेंट इकोसिस्टम निर्माण करण्याप्रती आपली वचनबद्धता सिद्ध करण्यासाठी कंपनीने हे पाऊल उचलले आहे. गोदरेज अॅग्रोव्हेटचा सीएसआर उपक्रम म्हणून दिशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम 'कॅम्पस-टू-कॉर्पोरेट फिनिशिंग स्कूल' म्हणून डिझाइन करण्यात आला आहे. कृषी आणि तत्सम शाखांमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थिनींची रोजगारक्षमता वाढवणे हा याचा मुख्य उद्देश आहे. हा कार्यक्रम विक्री कौशल्ये, संवाद कौशल्ये



आणि व्यावसायिक सज्जता यांसारख्या उद्योगासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांवर भर देतो. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना औपचारिक करिअरमध्ये पाऊल ठेवणे सोपे होईल, असा कंपनीचा ठाम विश्वास आहे. 'वनएमएनबी फाऊंडेशन' आणि 'इक्का लर्निंग फाऊंडेशन' यांच्या सहकार्याने राबवल्या जाणा-या या उपक्रमाने आतापर्यंत आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटकमधील २७६हून अधिक विद्यार्थिनींना प्रशिक्षित केले आहे. यातील अनेक विद्यार्थिनींनी नामांकित संस्थांमध्ये नोकरीच्या संधी मिळवल्या आहेत. महिलांना कृषी क्षेत्रात सक्षम करण्याच्या दिशेने ही कंपनीची महत्त्वपूर्ण कामगिरी समजली जाते.

या प्रसंगी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील कटारिया म्हणाले की, भारतातील कृषी क्षेत्र सध्या परिवर्तनाच्या टप्प्यावर असून शाश्वत वाढ आणि ग्रामीण समृद्धीसाठी कुशल मनुष्यबळ तयार करणे अत्यावश्यक आहे. 'दिशा' उपक्रमाद्वारे सक्षम महिला व्यावसायिकांची फळी तयार करण्याचा कंपनीचा मानस आहे. गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपच्या शाश्वतता आणि सीएसआर विभाग प्रमुख पाकजान दस्तूर यांनी सांगितले की, सर्वसमावेशकता हा कंपनीच्या प्रगतीचा पाया असून 'दिशा' उपक्रम महिलांना कृषी उद्योगात अर्थपूर्ण करिअर संधी उपलब्ध करून देईल. कंपनीच्या मुख्य मानव संसाधन अधिकारी मल्लिका मुत्रेजा यांनी नमूद केले की, महिलांच्या करिअर विकासासाठी सतत गुंतवणूक करणे आवश्यक असून 'दिशा'सारखे उपक्रम भविष्यातील आव्हानांना तोंड देणारे सक्षम मनुष्यबळ तयार करण्यास मदत करतील.गोदरेज अॅग्रोव्हेटने कृषी क्षेत्रात १ लाख महिलांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून आतापर्यंत विविध उपक्रमांच्या माध्यमातून ६३,३०० हून अधिक महिलांना करिअरच्या मुख्य प्रवाहात आणले आहे. 'दिशा' उपक्रम हा त्या व्यापक दृष्टीकोनाचा महत्त्वाचा भाग आहे.

# बोरवेलची कॉपरची वायर चोरली

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी :** बोरवेलची कॉपरची वायर चोरल्या प्रकरणी अज्ञाता विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 16 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. अशोक बाबुराव खैरे हे सूर्य नगर, विटावा, ठाणे येथे राहत असून त्यांचे फार्म हाऊस मोरबे येथे आहे. या फार्म हाऊस वर असलेल्या बोरवेलची चाळीस हजार रुपये किमतीची कॉपरची वायर अज्ञाताने चोरून नेली.

# सोसायटीच्या व्हाट्सअप ग्रुप मधून रिमूव केले म्हणून केली मारहाण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी :** सोसायटीच्या व्हाट्सअप ग्रुप मधून रिमूव केल्याचा राग मनात धरून लाथाबुक्क्यांनी मारहाण आणि दगडाने मारहाण केल्याप्रकरणी दोघांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 16 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. महादेव अनंत नेरकर हे नेंचरल होम सोसायटी, टेमघर नेरे, येथे राहत असून आरोपी अनिल मंडल व त्यांचा मुलगा सचिन मंडल यांनी सोसायटीच्या व्हाट्सअप ग्रुप मधून त्यांना रिमूव्ह केले. या गोष्टीचा राग मनात धरून महादेव नेरकर यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच सचिन याने त्यांच्या डोळ्यावर दगड मारून त्यांना जखमी केले.

# उरण नगरपालिकेत लोकप्रतिनिधींचा प्रशासकीय कामात हस्तक्षेप; त्रस्त अधिकाऱ्यांचे सामुहिक बदलीसाठी साकडे;

## नगराध्यक्षांच्या मनमानी कारभाराने अधिकारी कर्मचारी मानसिक तणावात

**दैनिक युवक आधार**
**उरण (प्रतिनिधी) :** उरण नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि त्यांच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून प्रशासकीय कामात सातत्याने हस्तक्षेप होत असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. नगराध्यक्ष व काही पदाधिकारी यांच्या 'दडपशाही' आणि मनमानी कारभाराला कंटाळून नगरपरिषदेतील सर्व संवर्ग अधिकारी आणि राज्यस्तरीय अधिकाऱ्यांनी आपली अन्यत्र बदली करण्यात यावी, अशी मागणी वरिष्ठ प्राधिकाऱ्यांना केली आहे.

नगरपरिषदेत राजकीय मतभेद टोकाला पोहोचले असून त्याचा नाहक त्रास प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिला जात आहे. संवर्ग कर्मचाऱ्यांविरुद्ध वरिष्ठ कार्यालयात जाणीवपूर्वक तथ्यहीन आणि खोट्या तक्रारी करून त्यांच्यावर मानसिक दबाव आणला जात आहे.

यात एका निलंबित कर्मचाऱ्याच्या प्रभावाखाली नगराध्यक्ष व त्यांचे पदाधिकारी हे कृत्य करत असल्याची नगरपरिषद मध्ये दबक्या आवाजात चर्चा आहे. या सर्व परिस्थितीने नगरपालिकेत शिस्त उरली नसून दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नगराध्यक्ष आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या या हस्तक्षेपामुळे अधिकाऱ्यांचे मनोबल खच्ची झाले आहे. याचा थेट परिणाम शहराच्या विकासकामांवर आणि नागरिकांना मिळणाऱ्या सेवांवर होत आहे. "आम्ही मानसिक तणावाखाली आहोत, आमचे कौटुंबिक आयुष्य विस्कळीत होत आहे," अशा शब्दांत अधिकाऱ्यांनी विशेषत महिला अधिकाऱ्यांनी आपल्या व्यथा मांडल्या आहेत. उरण नगरपरिषदेतील सध्याची परिस्थिती पाहता, येथे काम करणे कठीण झाले असल्याचे सांगत, सर्व राज्यस्तरीय संवर्ग अधिकाऱ्यांनी आपली बदली करावी, अशी विनंती नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे केली आहे. आता यावर वरिष्ठ प्रशासन काय पाऊल उचलते आणि नगराध्यक्षांच्या या कार्यपद्धतीवर काय कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# विदर्भातील शाळा २६ जूनलाच सुरू करा; शिक्षक भारतीची शिक्षण संचालकांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**
**भावेश धंधुकीया/ भंडारा जिल्हा प्रतिनिधी :** लाखनी -विदर्भातील सर्व शाळा इतर विभागांप्रमाणे लवकर सुरू करण्याचा निर्णय शासन आदेश आणि उच्च न्यायालयाच्या निर्देशांच्या विरोधात असल्याचा दावा करत शिक्षक भारती शासनमान्य संघटनेने शिक्षण संचालनालयाकडे तीव्र आक्षेप नोंदविला आहे. विदर्भातील शाळा २६ जूनपासूनच सुरू करण्याबाबत तातडीने सुधारित आदेश निर्गमित करावेत, अशी मागणी संघटनेचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी शिक्षण संचालकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. शिक्षण संचालनालयाने २८ मार्च २०२६ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार राज्यातील शाळांची उन्हाळी सुट्टी व नवीन शैक्षणिक वर्ष सुरू करण्याचे नियोजन जाहीर केले आहे. मात्र, या नियोजनात विदर्भातील तीव्र उन्हाळा आणि त्यासंदर्भातील जुन्या शासन निर्णयांचा विचार करण्यात आलेला नाही, असे संघटनेने म्हटले आहे. उच्च न्यायालयाचा आदेश: ८ जून २००७ रोजी नागपूर खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार, विदर्भातील शाळा केवळ २६ जूनपासूनच सुरू कराव्यात असे स्पष्ट निर्देश आहेत.२० एप्रिल २०२३ च्या शासन परिपत्रकातही विदर्भासाठी स्वतंत्र तारखेचा उल्लेख आहे. असे असतानाही नवीन आदेश काढण्यात आला आहे.२८ मार्च २०२६ चा नवा आदेश हा न्यायालयीन निर्णयाचा अवमान करणारा असल्याचे शिक्षक भारतीने म्हटले आहे. विदर्भासाठी स्वतंत्र सुधारित आदेश तत्काळ काढावा, या मागणीसाठी जिल्हाध्यक्ष उमेश सिंगनजुडे मुख्य कार्यवाह विनोद किंदर्ले,व यांच्यासह संजय वनवे, सतीश धुर्वे, प्रा. नदीम खान, राकेश झोडे,नंदकिशोर क्षीरसागर,,गंगाधर भदाडे यांनीही या मागणीला पाठिंबा दर्शविला आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# सत्तेच्या विरोधात लढण्याचे पत्रकाराचे कर्तव्य मी बजावतो – पत्रकार प्रवीण पुरो

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** उरण येथील कोमसाप मधुबन कट्ट्यावर " भोंदू बाबा या विषयांवर झालेल्या कविसंमेलनात जीवन गौरव मूर्ती पत्रकार प्रवीण पुरो या विषयावर बोलताना म्हणाले की,एका अशोक खरात या एका भोंदूने महाराष्ट्राची प्रतिष्ठा धुळीला मिळवली आहे. त्याला कारण सरकार आहे.जे सरकार चुकीचे करीत आहे,त्या विरोधात लढण्याचे पत्रकाराचे कर्तव्य करणं आवश्यक आहे ते मी करीत आहे.यावेळी प्रवीण पुरो यांच्यासोबत लेखक नाट्यकर्मी शरद कोरडे आणि पत्रकार नागेश कुलकर्णी यांनाही कौमसापकडून जीवन गौरव पुरस्काराने कट्ट्याचे अध्यक्ष राम म्हात्रे यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. अध्यक्ष स्थानी सुरेश शिंदेसर होते.सूत्रसंचालन मच्छिंद्र म्हात्रे यांनी सुरेख केले.

विमला उरण येथे होणा-या दर महिन्याच्या १७ तारखेच्या १२६ व्या कविसंमेलनात भोंदूबाबांच्या भोंदूगिरीवर अतिशय परखड विचारांच्या कविता सादर करण्यात आल्या.साहित्यरत्न प्रा.एल.बी. पाटील



अजय शिवकर, नरेश पाटील, म.का. म्हात्रे,अनिल भोईर, कवी पुगावकर, भरत पाटील,हेमंत पाटील, रामचंद्र म्हात्रे,मारुती तांबे, भालचन्द्र म्हात्रे,ज्येष्ठ कवी मेस्त्री,नारायण धरत इत्यादी १६ कवींनी कविता सादर केल्या. ॲड.राजेंद्र जैन, सूर्यकांत दांडेकर, चंद्रकांत मुकादम, नीळवर्ण दत्ताराम, प्रकाश पाटील,राम पाटील, बाजीराव घरत इत्यादी शहरातील प्रतिष्ठित नागरिकांची प्रमुख उपस्थिती होती.

# रायगड राज्य पॉवरलिफ्टिंग ठरला उपविजेता

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** सांगली येथील ऑफिसर्स क्लब,आमराई या ठिकाणी महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन, मुंबई आणि सांगली जिल्हा असोसिएशनच्या वतीने राज्य सबज्युनिअर, ज्युनिअर आणि गतिमंद (मुले/मुली) यांची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धा 11 ते 12 एप्रिल2026 या कालावधीत झाली. या स्पर्धात रायगडच्या खेळाडूंनी 3 सुवर्ण, 4 रौप्य,आणि 2 कांस्य अशी एकूण 9 पदक विविध गटात मिळवली आहेत. तसेच सब ज्युनिअर (पुरुष) गटाचे संघिक उपविजेतेपद प्राप्त केले आहे. सदरचे उपविजेतेपद संघ व्यवस्थापक संदीप कृष्णा पाटकर यांनी राजेश अंगद आणि अमोल काईनकर, जितेश आणि यश यांच्या उपस्थितीत स्वीकारले.

यावेळी स्पेशल मुलांचे स्पर्धात पेण येथील हनुमान व्यायाम शाळेच्या



जितेश साजेकर (सुवर्ण पदक, 53किलो वजनी गट, ज्युनिअर) आणि यश पंगत (रौप्यपदक, 66 किलो वजनी गट, सिनिअर) यांना मिळाले आहे. या गतिमंद मुलांना हनुमान व्यायाम शाळा पेणचे संचालक राजेश अंगद (राष्ट्रीय खेळाडू पॉवरलिफ्टिंग) यांचे प्रशिक्षण असून एकलव्य व्यवसायिक प्रशिक्षण केंद्रचे शिक्षक अमोल काईनकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. पदक विजेते खेळाडू पुढील प्रमाणे आहेत.

***सुवर्ण पदक विजेते***

१)अद्वैत भोसले(66कीलो,सब ज्युनिअर , कॉडझिला जिम महाड)

२)अथर्व लोधी (ज्युनिअर, 83 किलो, संसारे फिटनेस पेण)

३)जितेश साजेकर (स्पेशल चाईल्ड, ज्युनिअर,५३ किलो, हनुमान व्या. शाळा पेण)

**रौप्य पदक विजेते**

१)पार्थ देशपांडे (सबज्युनिअर ,८३ किलो कॉडझिला जिम महाड)

२)रौनक रोशन जितेकर (सब ज्युनिअर १०५ किलो वजनी गट ,चेतन जिम दापोली- पारगाव, पनवेल)

३)साहिल पोरवाल(ज्युनिअर ५३ किलो, वैयक्तिक खोपोली)

४)यश पंगत (स्पेशल चाईल्ड सिनिअर ,६६ किलो, हनुमान व्या. शाळा पेण)

**कांस्य पदक विजेते**

१)संस्कार सरदार(ज्युनिअर, 74 कीलो वजनी गट वैयक्तिक)

२)श्रेया मांढरे (सब ज्युनिअर, ६९किलो वजनी गट , संसारे फिटनेस पेण या सर्व पदक विजेते खेळाडूंचे अभिनंदन करून याबाबत पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगड चे अध्यक्ष गिरीश शरद वेदक, सहसचिव सचिन भालेराव, कार्यकारणी सदस्य सुभाष टेंबे, संदीप पाटकर, मानस कुंटे(अलिबाग), खजिनदार राहुल गजरमल, ज्येष्ठ खेळाडू आणि सदस्य माधव पंडित, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, असोसिएशन सहायक रामचंद्र गावडे यांनी आनंद व्यक्त केला आहे आणि राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत.

# डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचा रायगड पोलिसांना मोठा योगदान

## ६१५ बॅरिकेड्स व १६ ब्रेथ ॲनालायझर मशिन्सचे वाटप!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे /अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या सौजन्याने रायगड पोलीस दलाला ६१५ बॅरिकेड्स व १६ ब्रेथ ॲनालायझर मशिन्सचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम सद्गुरू डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या शिकवणीचा जिवंत आढावा घालणारा आहे – 'आपण देशासाठी काय करतोय आणि ते रून फेडावे लागतात.' या विचाराने प्रेरित होऊन प्रतिष्ठान जनमानसात सेवा भावना रुजवत आहे.

डॉ. सचिन दादा धर्माधिकारी, श्री. उमेश दादा धर्माधिकारी व श्री. राहुल दादा धर्माधिकारी यांच्या हस्ते जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती आँचल दलाल यांना सदर वस्तू सुपूर्द करण्यात आल्या. या उपकरणांमुळे ट्रॅफिक सुरक्षितता व अपघात नियंत्रण मजबूत होईल. ब्रेथ ॲनालायझरमुळे ड्रंकन ड्रायव्हिंगवर लगाम घातला जाईल,



तर बॅरिकेड्स रस्त्यावरील अनियंत्रित वाहनप्रवेश रोखतील.

**सद्गुरूंच्या शिकवणीचे छान विचार रुजवताना...**

प्रतिष्ठानाचे प्रमुख डॉ. सचिन धर्माधिकारी म्हणाले, "सद्गुरूंनी सांगितल्याप्रमाणे, छान विचार रुजवले तर चांगली कामे व्हतात. माणसा-माणसात प्रेम, आपुलकी व आपलेपणा वाढतो. यामुळे देश-राज्य-जिल्हा-गाव एकसंध होऊन गुण्या-गोविंदाने जगता येते. हा उपक्रम तरुणांना प्रेरणा देईल की, प्रत्येकाने सेवा हीच खरी रून मानून पुढाकार घ्यावा. गावपातळीवर अशा चळवळींमुळे सामाजिक एकता वाढेल व भविष्यात निसर्गसुरक्षेसाठीही उपक्रम राबवणार आहोत."

श्री. उमेश धर्माधिकारी यांनी जोडले, "सद्गुरूंच्या मार्गदर्शनाने सेवा हीच खरी भक्ती ही शिकवण प्रत्यक्षात आणत आहोत. यामुळे पोलिस बंधूंचे कार्य सुलभ होईल व नागरिकांमध्ये रस्ता शिस्तीचा संस्कार होईल."

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती आँचल दलाल म्हणाल्या, "प्रतिष्ठानाच्या या दानशीलतेमुळे रायगड पोलिस दलाची क्षमता वाढेल. हे केवळ उपकरणे नाहीत, तर सामाजिक जबाबदारीचा संदेश आहेत. अशा चांगल्या विचारांनी सर्वजण एकत्र येऊया!"

हा उपक्रम रायगड जिल्ह्यातील सामाजिक जागृतीचा मैलाचा दगड आहे. सर्वांनी सद्गुरूंच्या शिकवणीप्रमाणे प्रेम व सेवाने वागले, तर खरा स्वच्छंद विकास साध्य होईल!


# उष्णतेच्या लाटेत स्वतःचे आरोग्य जपा; डॉ. कैलास कालापाड यांचे मार्गदर्शन

## वाढत्या तापमानात उष्माघातापासून बचावासाठी सोपे घरगुती उपाय

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** उन्हाळ्याच्या दिवसांत वाढत्या तापमानामुळे उष्णतेची लाट तीव्र होत असून उष्माघात (हीट स्ट्रोक) होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ही एक गंभीर व जीवघेणी अवस्था असून नागरिकांनी याबाबत विशेष सतर्कता बाळगावी, असे आवाहन ऑक्यूथेरपिस्ट तसेच आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, वाशिमचे डॉ. कैलास कालापाड यांनी केले आहे.सामान्यतः मानवी शरीराचे तापमान 98.6 फॅरेनहाइट (37°C) इतके असते. मात्र हे तापमान अत्याधिक वाढल्यास (हायपरथर्मिया) किंवा कमी झाल्यास (हायपोथर्मिया) शरीराच्या अवयवांवर दुष्परिणाम होऊ शकतो. उष्माघात म्हणजेच सनस्ट्रोक किंवा हीट स्ट्रोक ही अशीच एक धोकादायक स्थिती असून वेळेत उपचार न झाल्यास ती जीवघेणी ठरू शकते.

उष्माघात टाळण्यासाठी दुपारी 12 ते



3 या वेळेत बाहेर जाणे टाळावे. तापमान जास्त असताना बाहेर राहावे लागल्यास थकवणाऱ्या हालचाली टाळाव्यात आणि वेळोवेळी पाणी पिणे आवश्यक आहे. तहान लागली नसली तरीही शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये यासाठी नियमित पाणी सेवन करावे.घराबाहेर पडताना हलक्या रंगाचे, सैल व सुटसुटीत कपडे परिधान करावेत. डोळ्यांसाठी गॉगल्स, तसेच डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा. पायात बूट किंवा चपला वापरणेही आवश्यक आहे. अल्कोहोल, चहा, कॉफी व कार्बोनेटेड पेये यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते, त्यामुळे अशा पेयांचे सेवन टाळावे.

उघड्यावर काम करणाऱ्यांनी विशेष काळजी घेऊन टोपी किंवा छत्रीचा वापर करावा. तसेच ओल्या कापडाने डोके, मान, चेहरा व हात-पाय पुसल्यास शरीराला थंडावा मिळतो. चक्कर येणे, अशक्तपणा जाणवणे किंवा तब्येत बिघडल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवण्यासाठी लस्सी, तांदळाचे पाणी, लिंबू सरबत, टरबूज, द्राक्षे, नारळ पाणी आणि ताक यांसारख्या घरगुती पेयांचे सेवन करणे फायदेशीर ठरते.उष्णतेच्या वाढत्या तीव्रतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी योग्य काळजी घेऊन स्वतःचे आरोग्य सुरक्षित ठेवणे अत्यंत गरजेचे असल्याचे डॉ. कैलास कालापाड यांनी सांगितले.

# अक्षय तृतीया मुहूर्तावर वैद्यकीय विज्ञान अकादमीचा पदग्रहण सोहळा

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** मध्य भारतातील एक प्रतिष्ठित व वैशिष्ट्यपूर्ण वैद्यकीय संस्था असलेल्या वैद्यकीय विज्ञान अकादमी, (अकादमी ऑफ मेडिकल सायन्सेस ) नागपूर तर्फे सन २०२६–२७ या वर्षासाठीचा पदग्रहण सोहळा अक्षय तृतीया या शुभमुहूर्तावर आयोजित करण्यात आला आहे. सुमारे २८०० तज्ञ व अतितज्ञ वैद्यकीय सदस्य असलेली ही संस्था उच्च दर्जाच्या शैक्षणिक उपक्रमांसाठी ओळखली जाते.

या सोहळ्यात डॉ. अनुराधा व्ही. रिधोरकर या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारणार असून त्यांच्या नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा यावेळी संपन्न होणार आहे.

हा कार्यक्रम रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता हॉटेल सेंटर पॉईंट, रामदासपेठ, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पंकज देसाई, ज्येष्ठ शिक्षक व प्रेरणादायी वक्ते



उपस्थित राहणार असून, मान्यवर पाहुणे म्हणून विजय फणशीकर, द हितवादा या वृत्तपत्राचे मुख्य संपादक उपस्थित राहणार आहेत.

यावर्षीचा विषय

“विविध वैद्यकीय शाखांचा संगम – नव्या क्षितिजांची निर्मिती”

असा असून, वैद्यकीय क्षेत्रातील विविध शाखांमधील समन्वय व नव्या संधींचा शोध यावर भर देणारा आहे.संस्थेचे विद्यमान अध्यक्ष डॉ. नैनेश पटेल, मानद सचिव डॉ. समीर एस. जहागीरदार तसेच सोहळ्याचे अध्यक्ष डॉ. निखिल बालंखे यांनी सर्व सदस्य व वैद्यकीय व्यावसायिकांना या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# आदिवासींच्या विकासाला 'वेळेचे' ग्रहण; सरकारकडे जनजाती सल्लागार परिषदेसाठी मुहूर्तच मिळेना!

**दैनिक युवक आधार**

**महेश पेन्दोर /यवतमाळ :** "आदिवासी समाजावर कोणत्याही परिस्थितीत अन्याय होऊ देणार नाही," असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात दिले असले, तरी वास्तवात मात्र आदिवासींच्या कल्याणासाठी स्थापन केलेल्या 'जनजाती सल्लागार परिषदे'च्या (TAC) बाबतीत शासन प्रचंड उदासीन असल्याचे दिसून येत आहे. भारतीय संविधानाच्या ५ व्या अनुसूचीनुसार, आदिवासींच्या हिताचे रक्षण करण्यासाठी या परिषदेच्या वर्षातून किमान दोन बैठका होणे बंधनकारक आहे. मात्र, गेल्या १५ वर्षांत अपेक्षित ३० बैठकांऐवजी केवळ ६ बैठकाच झाल्याने आदिवासी समाजाच्या समस्या सोडवण्याऐवजी त्या 'वेळेच्या' ग्रहणामुळे टांगणीवर पडल्या आहेत.

संविधानातील कलम ४(१) नुसार, आदिवासी समाजाच्या योजना, धोरणे आणि विकासाबाबत राज्यपालांना मार्गदर्शन



करण्यासाठी ही परिषद कार्य करते. परंतु, १ जानेवारी २०१० ते डिसेंबर २०२४ पर्यंतचा इतिहास पाहिला, तर बैठकांचा प्रचंड दुष्काळ जाणवतो. आश्चर्याची बाब म्हणजे, महायुती सरकार सत्तेत आल्यापासून आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतल्यापासूनच्या सव्वा वर्षात या परिषदेची एकही बैठक झालेली नाही.

आदिवासींच्या कल्याणाचा मुद्दा केवळ आश्वासनांपुरताच मर्यादित राहिला आहे का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. या उदासीनतेविरुद्ध १३ मार्च २०२६ रोजी आदिवासी समाजाच्या २२ आमदारांनी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची भेट घेऊन ही बैठक तातडीने घेण्याची विनंती केली. मात्र, अद्यापही या बैठकीसाठी मुहूर्त सापडलेला नाही.

राष्ट्रीय जनजाती आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. रामेश्वर उराव यांनी २०१२ मध्येच सुचवले होते की, या परिषदेचे

**महाराष्ट्राच्या राजकारणात आदिवासींची उपेक्षा: १५ वर्षांत नियमानुसार ३० बैठका अपेक्षित, प्रत्यक्षात झाल्या फक्त ६**

अध्यक्ष राज्यपाल आणि उपाध्यक्ष मुख्यमंत्री असावेत, जेणेकरून निर्णयांची अंमलबजावणी वेगाने होईल. ट्रायबल फोरमचे पुंडलिक मेश्राम यांनी टीका केली आहे की, कागदावर तरतुदी असूनही शासन वेळकाढूपणा करत आहे. आदिवासी समाजातील रिक्त पदांची भरती, जमिनीचे हक्क आणि कल्याणकारी योजनांचा लाभ यांसारख्या गंभीर प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी सरकारकडे वेळ नाही का? हा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.

# वैष्णवी सल्कमोडेची ग्रामसेवक पदी निवड; भोकरफाटा येथे भव्य सत्कार

**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर प्रतिनिधी/ अरविंद पांचाळ :** अर्धापूर तालुक्यातील दाभड येथील वैष्णवी बालाजी सल्कमोडे हिची ग्रामसेवक पदी निवड झाल्याबद्दल तिचा भोकरफाटा येथील शंभू मेडिकल येथे भव्य सत्कार सोहळा संपन्न झाला. तिच्या या यशाबद्दल गावकऱ्यांनी व उपस्थित



मंडळींनी आनंद व्यक्त करत शुभेच्छांचा वर्षाव केला.

या प्रसंगी दाभड येथील ज्येष्ठ नागरिक श्रीराम पावडे, माजी पंचायत समिती सभापती गोविंद महाराज गोदरे, दाभड नगरीचे उपसरपंच अरविंद पांचाळ, बेगजी मरकुंदे, अमोलभाऊ बारसे, माजी सरपंच सतीश कदम, उपसरपंच लिंगोजी चिंतले, दिनेश लोणे पाटनुरकर, संभाजी राजेगोरे, प्रा. राजेश राजेगोरे, संतोष राजेगोरे, पांडुरंग राजेगोरे, अंकुश कदम, राम सल्कमोडे, गजानन टेकाळे, माधव टेकाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी वैष्णवी सल्कमोडे हिच्या यशाबद्दल कौतुक करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तिच्या निवडीमुळे दाभड गावाचे नाव उंचावले असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली

# "पिलीव व परिसरात हनुमान जयंती उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी"

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर :** माळशिरस तालुक्यातील पिलीव या ठिकाणी सालाबाद प्रमाणे श्री हनुमान मंदिरात सालाबाद प्रमाणे श्री हनुमान जयंतीचे आयोजन अतिशय चांगल्या पद्धतीने केले होते. मंदिरासमोर मंडप उभारून भाविक भक्तांना निवाऱ्याची ही व्यवस्था करण्यात आलेली होती. श्री विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळाचा सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम अतिशय मंत्रमुग्ध करण्यासारखा झाला. धार्मिक विधी व्यवस्थितपणे पार पडले.प्रा. जयंत गुरव यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. तर ग्रामपंचायत माजी सदस्य जीवन गुरव, नंदकुमार गुरव, सुनील गुरव, भगवान जावळे, विश्वास जावळे, श्री विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळाचे सन्माननीय सर्व सदस्य, लखन काळे, राजेंद्र काळे, किशोर लोखंडे व इतर सर्व भाविक भक्त ग्रामस्थ बहुसंख्येने जन्मोत्सवाच्या कार्यक्रमाला उपस्थित होते. हनुमान जन्मोत्सवाच्या वेळी श्री हनुमानाचा पाळणा व गीत सादर करण्यात आले. व आरतीनंतर महाप्रसाद व फळे वाटपानंतर" बजरंग बली की जय श्रीराम जय राम जय जय राम"या जयघोषात कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.पिलीव प्रमाणेच परिसरात शिंगोर्णी, बचेरी सुळेवाडी, चांदापुरी, गारवाड, पठाण वस्ती, झिंजेवस्ती,कुसमोड, काळमवाडी, कोळेगाव, फळवणी, तांदुळवाडी, शेंडेचिंच ,मळवली अशा ठिकाणी सुद्धा श्री हनुमान जन्मोत्सवाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# उन्हाळ्यात दुधाळ जनावरांची घ्यायची काळजी :- पशुवैद्यकीय अधिकारी डॉ . संदीप शिंदे

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी/ मारुती सत्रे**

उन्हाळ्यात जनावरांची योग्य काळजी घेतली नाही तर उष्माघात, दूध उत्पादन कमी होणे, भूक मंदावणे आणि आजार वाढण्याची शक्यता असते. खाली सोप्या आणि उपयोगी टिप्स दिल्या आहेत:

1. सावलीची व्यवस्था

जनावरांना थेट उन्हात ठेवू नका

गोठा थंड, हवेशीर आणि सावलीत असावा

छपरावर गवत/पेंढा टाकल्यास उष्णता कमी होते

2. स्वच्छ पाण्याची उपलब्धता

दिवसभर थंड व स्वच्छ पाणी उपलब्ध ठेवा

पाणी दिवसातून 3–4 वेळा



बदलावे

एका मोठ्या जनावराला 50–80 लिटर पाणी लागते

3. योग्य आहार

हिरवा चारा जास्त द्यावा (उदा. ज्वारी, मका)

कोरडा चारा कमी द्या

खनिज मिश्रण mineral mixture (गुडमिन) आणि मीठ द्यावे

सकाळी लवकर किंवा संध्याकाळी चारण द्यावे

4. उष्माघात टाळण्यासाठी उपाय

जनावरांना दुपारी बाहेर सोडू नका

पाण्यात ORS/ग्लुकोज मिसळून देऊ शकता

थंड पाण्याने अंग धुणे (स्प्रे) फायदेशीर

5. स्वच्छता आणि आरोग्य

गोठा दररोज स्वच्छ ठेवा

शेण व ओलसरपणा काढून टाका

माशा/किडे नियंत्रणासाठी फवारणी करा

6. नियमित तपासणी

जनावरांमध्ये लक्षणे दिसली तर लगेच पशुवैद्यांचा सल्ला घ्या

लसीकरण वेळेवर करा

उष्माघाताची लक्षणे

तोंड उघडून श्वास घेणे

जास्त लाळ येणे

उभे राहण्यास त्रास

ताप वाढणे

# पोहरा येथे 'प्रशासन आले जनतेच्या दारी'; राजस्व समाधान शिबिरात शेकडो प्रकरणांचा निपटारा

**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे लाखनी** : नागरिकांचे महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न एकाच ठिकाणी सोडवावेत आणि शासकीय कामासाठी होणारी पायपीट थांबावी, या उद्देशाने पोहरा येथे 'छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर' उत्साहात पार पडले. शिबिरात शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध सेवांचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद सदस्या विद्या कुंभरे या होत्या. प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार शीतल घावटे यांच्यासह माजी जि.प. सदस्य सुदाम शहारे, पं.स. सदस्या शारदा मते, पोहराचे सरपंच रामलाल पाटणकर, मानेगावच्या सरपंच आशा सिंगनजुडे, पेंढरीच्या सरपंच इंदिरा बांडेबूचे आणि चान्नाचे सरपंच परसराम फेंडरकर उपस्थित होते.

या शिबिरात महसूल विभागाने 'सिंगल विंडो' प्रणाली राबवून अर्ज स्वीकृतीपासून ते प्रमाणपत्र वितरणापर्यंतची प्रक्रिया जलद गतीने पूर्ण केली. उत्पन्न, रहिवासी, जात व नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच ७/१२ मधील त्रुटी दुरुस्त करून डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ व ८-अ उतारे नागरिकांना देण्यात आले.

आरोग्य विभागानेही या शिबिरात महत्त्वाची भूमिका बजावत प्राथमिक आरोग्य केंद्र



पोहराच्या वतीने डॉ. स्नेहल गजभिये यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य शिबिर आयोजित केले. यामध्ये रुग्णांची मोफत रक्त तपासणी, आरोग्य तपासणी व औषधोपचार करण्यात आले.

"शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ थेट शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आता नागरिकांना कार्यालयांचे उंबरठे झिजवण्याची गरज नसून प्रशासन स्वतः त्यांच्या दारी आले आहे," असे मत तहसीलदार शीतल घावटे यांनी व्यक्त केले. या उपक्रमात ग्रामपंचायत तसेच शासकीय विद्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेत नागरिकांना सेवा पुरवल्या.

या यशस्वी आयोजनासाठी यशवंत खेडीकर, विवेक गिऱ्हेपुंजे, रामेश्वर अंबादे, विष्णू गिऱ्हेपुंजे, नायब तहसीलदार डी.ए. उरकुडकर, आर. जे. चवरे, ए. डी. वाघाडे, टी. डी. मेश्राम, प्रणय सहदेवकर, आर. एस. टेंभुर्णी आणि रोशन कापसे यांनी विशेष परिश्रम घेतले.

जिल्हा परिषद सदस्या विद्या कुंभरे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, "ग्रामीण भागातील नागरिकांसाठी हे शिबिर एक वरदान ठरले आहे. एकाच ठिकाणी आरोग्य तपासणी, महसुली दाखले आणि शेतीविषयक कामांचा निपटारा झाल्याने नागरिकांचा वेळ व पैसा दोन्ही वाचले आहेत. अशा उपक्रमांमुळे शासनावरील विश्वास अधिक दृढ होतो."

# संघर्ष नगर, चांदिवली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती २०२६ उत्साहात

## ऐक्य, शिस्त आणि भव्य मिरवणुकीतून अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी** : चांदिवली येथील संघर्ष नगर परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अत्यंत नियोजनबद्ध, शांततापूर्ण आणि उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. परिसरातील नागरिकांनी आपापसातील मतभेद विसरून एकत्र येत महामानवाला अभिवादन केले, ही या कार्यक्रमाची विशेष बाब ठरली.

संकुल क्र. ९ मधून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक ईश्वर तायडे साहेब यांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्रिशरण पंचशील ग्रहण केले आणि अभिवादन केले. त्यानंतर जयंती मिरवणुकीला सुजाता महिला मंडळाच्या कार्यकर्त्या सौ. सुनिता लांडगे ताई तसेच संकुल क्रं २० येथील रमाई महिला मंडळाच्या रुख्मिणी खरात ताई व त्यांच्या महिला कार्यकर्त्या यांच्या नेतृत्वाखाली दणक्यात प्रारंभ



झाला. महिलांचा उत्स्फूर्त सहभाग मिरवणुकीत विशेष लक्षवेधी ठरला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेने सजवलेला रथ आकर्षक असा उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. भारतीय बौद्ध महासभेचे ज्येष्ठ कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाच्या देखरेखीत सक्रिय सहभाग घेतला. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू न देता कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला, याबद्दल आयोजकांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले.

या मिरवणुकीत दामोदर गुरुजी, मिलिंद बनाटे, चंद्रकांत कांबळे,सुनील मगरे, सिद्धार्थ म्हस्के, भाऊसाहेब पटेकर, सचिन मगरे,दैनिक अखंड झेप मुंबई प्रतिनिधी : नानासाहेब डी. खैरे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा सहभाग होता. संकुल क्र. ९ ते संकुल क्र. ३२ पर्यंत डीजेच्या तालावर बाबासाहेबांच्या गीतांवर महिला, पुरुष, युवक, युवती तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या उत्साहात नृत्य करत सहभागी झाले.

मिरवणुकीदरम्यान विविध सामाजिक संस्थांकडून पाणी, नाश्ता, सरबत आणि समोसे यांचे वाटप करण्यात आले. सर्वांनी भाईचारा आणि आपुलकी जपत एकत्र येऊन जयंती साजरी केली, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरली.

संकुल क्र. ९ पासून सुरुवात झालेली मिरवणूक संकुल क्र. १३ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून पुढे मार्गस्थ झाली. त्यानंतर बोधिसत्व विहार, संकुल क्र. २० येथे कार्यक्रमाचा समारोप झाला. येथे कार्यकर्ते सिद्धार्थ मस्के यांनी डीजेच्या माध्यमातून वातावरण अधिक उत्साही केले. बोधिसत्व बुद्ध विहारच्या माध्यमातून केळी वाटपाचा उपक्रमही राबविण्यात आला.

या जयंतीनिमित्त सहकार्य करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे, सामाजिक संस्थांचे तसेच धम्मदान देणाऱ्या नागरिकांचे मनापासून आभार मानण्यात आले. समाजात एकता, बंधुता आणि संघटितपणा टिकवून ठेवण्याची गरज असल्याचे यावेळी मान्यवरांनी अधोरेखित केले.

यावेळी आ. उत्तम ढगे साहेब , मोहन राजगुरू, संदीप ढगे, महेंद्र भालेराव यांच्या वतीने सर्व जनतेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. मोठ्या संख्येने भीमसैनिकांनी उपस्थित राहून जयंतीचा आनंद घेतला, तर महिलांचा लक्षणीय सहभाग कार्यक्रमाची शोभा वाढवणारा ठरला.

एकूणच, संघर्ष नगरातील हा जयंती उत्सव सामाजिक ऐक्य, शिस्तबद्ध आयोजन आणि उत्साहाचा उत्तम नमुना ठरला.

# जि . प . शाळा कान्होली येथे डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी



**दैनिक युवक आधार**
**दीपक काळे/तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी शाळा, कान्होली येथे आज दिनांक .१४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची *१३५ वी जयंती* अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.


कार्यक्रमाची सुरुवात महामानवाच्या प्रतिमेचे पूजन करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या विचारांना उजाळा देत त्यांच्या महान जीवनकार्याचे प्रभावी वर्णन आपल्या भाषणातून केले. तसेच गीतांच्या माध्यमातून बाबासाहेबांना जन्मदिनाच्या शुभेच्छा अर्पण करून वातावरण भारावून टाकले.

यावेळी वर्षभर विविध उपक्रम व स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. तसेच २६ जानेवारी रोजी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातून मिळालेल्या बक्षीस निधीतून शाळेतील सर्व विद्यार्थी आणि नव्याने पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते दप्तरांचे वाटप करण्यात आले.शाळेचे मुख्याध्यापक श्री. किशोर बुरघाटे यांनी बाबासाहेबांच्या कार्याचा उजाळा देत विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाला श्री. सुरज वानखडे (शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष) तसेच श्री. आशिष तेलगोटे (पत्रकार) यांनी उपस्थित राहून बाबासाहेबांना आदरांजली वाहिली व विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन कु. पुष्पा वाकोडे (सहाय्यक शिक्षिका) यांनी केले. शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची आनंददायी सांगता करण्यात आली. हा सोहळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून, समता, शिक्षण आणि सामाजिक न्याय यांचा संदेश देणारा ठरला आहे.

# मुदगल बंधारा रामभरोसे; बंधारा पिचिंगला धोका

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे** : पाथरी/तालुक्यातील मुदगल येथील उच्च पातळी बंधार्‍याच्या पिचिंगवरून हायवामधून वाळूची सर्रासपणे वाहतूक " पाथरी पाटबंधारे अधिकारी झोपेत ,,या वाळूच्या हायवामुळे शेतकऱ्यांची पाईपलाईन फुटणार " पाथरी तालुक्यातील मुदगल येथील उच्च पातळी बंधार्‍याच्या पिचिंगवरून जड वाहनांसह वाहतूक करण्यास बंदी असतानाही सरार्सपणे पिचिंगवरून मानवत तालुक्यातील वाळूच्या धक्क्यातील हायवा सोनपेठ तालुक्यात यांच मुदगल बंधार्‍यावरून वाहतूक असल्याने बंधारा पिचिंगला मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता परिसरातील शेतकऱ्यांमधून व्यक्त केली जात असून या मुदगल बंधार्‍याच्या पिचिंगवरून हायवा वाहनांसह जड वाहतुकीस प्रतिबंध करावा अशी मागणी शेतकऱ्यांमधून केली जात असून पाथरी पाटबंधारे विभागाचे अधिकारी मात्र बघ्याची भूमिका घेत आहेत पाथरी तालुक्यातील मुदगल बंधारा सुरक्षिततेसाठी पाटबंधारे कार्यलय सुध्दा या ठिकाणी नसल्याने या मुदगल बंधार्‍याची सुरक्षा रामभरोसे आहे तर या बंधारा ठिकाणी एखाद्या अधिकार्यांची नियुक्ती करण्यात यावी पाथरी पाटबंधारे कार्यालयातील अधिकारी पाथरी शहराच्या ठिकाणावरून कार्यालयाचा कारभार हाकत असल्यामुळे मुदगल बंधारा सुरक्षा धोक्यात आली आहे. ही वाहने सोनपेठ शहराकडे जातात व पाथरी तालुक्यांत सुध्दा मोठ्या प्रमाणावर मुदगल मार्ग जातात "या मार्गावरून नेमका कोणाचा आशीर्वाद आहे"या बंधाऱ्यावरून दिवस रात्र हायवाव्दारे पिचिंगवरून



वाहतूक केली जात आहे त्यामुळे या पिचिंगचे तडे जात आहेत या मुळे मुदगल बंधार्ज्याला धोका निर्माण झाला आहे या संदर्भात मात्र पाथरी पाटबंधारे विभागातील अधिकारी बघ्याची भूमिका घेत असल्यामुळे मुदगल बंधार्‍याच्या पिचिंगला भेगा पडून बंधारा फुटण्याची भीती व्यक्त केली जात आहे परंतु यांचे सोयरसुतक मात्र कोणालाच नसल्याचे दिसून येत आहे काही शेतकऱ्यांनी बंधार्‍याच्या पिचिंगवरून हायवाच्या वाहतुकीस विरोध करण्याचा प्रयत्न केला असता या वाळू वाहतूकदारांनी अरेरावीची भाषा वापरून आमचे वाकडे कोणीही करू शकत नाही कोणाला सांगायचे ते सांगा असे उर्मटपणे भाषा वापरत आहेत तरी ही पाथरी पाटबंधारे विभागातील अधिकारी महसूल विभाग पोलिसांनी याकडे लक्ष द्यावे या मुदगल बंधाऱ्याच्या पिचिंगवरून जड वाहतुकीस प्रतिबंध करावा अशी मागणी शेतकऱ्यांमधून व्यक्त केली जात आहे अन्य गावातील शेतकऱ्यांनी पाईपलाईनव्दारे शेतामध्ये पाणी नेले आहे परंतु या वाळूच्या हायवा जात असल्यामुळे शेतकऱ्यांच्या पाईपलाईन फुटणार असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी देणे अवघड होईल आणि शेतकऱ्यांचे हजारोंचे नुकसान पाण्याअभावी पिके वाळू लागतील

# डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीला विरोधाचा नवीन पायंडा वरळी, नेरळ-ममदापुर या ठिकाणी विरोध

**दैनिक युवक आधार,**
**ता कर्जत / वैभव गायकवाड** : १४ एप्रिल ही फक्त तारीख नसून समस्त जगातील लोकांना प्रेरणा देणाऱ्या आणि जगभरात साजरी करण्यात येणाऱ्या भारतरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीची तारीख आहे. बाबासाहेबांचे कार्य आणि ख्याती संपूर्ण जगाला माहीत आहे. फक्त दलितांसाठीच नाही तर भारतामधील प्रत्येक नागरिकांस त्यांनी संविधानिक अनेक अधिकार देऊन सर्वांचाच उद्धार केला.

अशा महान व्यक्तीच्या जयंती ला आता विरोध होतांना दिसून येत आहे. १४ एप्रिल २०२६ रोजी वरळी BDD चाळ येथे जयंती उत्सव सुरु असताना डीजे चालवीण्यावर बंदी असल्याच्या नावाखाली पोलीस प्रशासनातर्फे कार्यक्रम बंद पाडण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे भीमसैनिकांमध्ये एकच रोष पाहवयास मिळाला.

वरळी येथील बाबासाहेबांची जयंती ही अतिशय नावाजलेली,बहुचार्चित आणि संपूर्ण मुंबई तसेच उपनगरामध्ये प्रसिद्ध मानली जाते. ही जयंती तब्बल ३ दिवस म्हणजे १४, १५ आणि १६ तारखेस साजरी केली जाते. या जयंती करिता स्थानिक पातळीवर महिनाभर आधीच सर्व तयारी सुरु झालेली असते. ज्यामध्ये सामाजिक प्रबोधन, संगीत कार्यक्रम, तसेच विविध सामूहिक कार्यक्रम राबविले जातात. या उत्सवाची माहिती व स्वरूप स्थानिक पोलीस स्थानक यांना आधीच कळवलेली असते परंतु, काही विरोधकांद्वारे १४ एप्रिल रोजी जाणीवपूर्वक जयंतीच्या कार्यक्रमास पोलीस प्रशासनाद्वारे विरोध करण्यात आला असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.

काही दिवसांपूर्वीच एका बड्या उद्योगपतीच्या मुलाचा वाढदिवस त्याच वरळीत मोठमोठे स्पीकर, डीजे लावून जल्लोषात साजरा करण्यात आला, तेव्हा मात्र पोलिसांनी बघ्याची भूमिका घेऊन त्या कार्यक्रमास संमती दिली आणि बाबासाहेबांच्या जयंती मध्ये कायदा सुव्यवस्था राहावी म्हणून बंदी आहे असे सांगण्यात आले. स्थानिक नागरिकांनी याचा तीव्र निषेध करून रस्त्यावरच आंदोलनाला सुरुवात केली आणि "आमच्या बापाची जयंती जशी दरवर्षी धूम-धडाक्यात साजरी होते तशीच साजरी होणार" या भूमिकेत जय भीम-जय भीम चे नारे लगावण्यात आले.

हे आंदोलन अधिक तीव्र झाल्यामुळे बड्या पोलीस अधिकाऱ्यांना (DCP/ Commissioner) देखील माध्यस्थी करावी लागली. हे आंदोलन अजून चिघळू नये याकरिता पोलिसांनी समंजस्याची भूमिका घेत अखेर २ तासानंतर डीजे वाजविण्याकरिता परवानगी दिली. याचा निषेध म्हणून BDD चाळ क्रमांक ९६, ९७, ९८, ९९ यांनी सर्व इमारतीच्या लाईट बंद करून रोष व्यक्त केला.

दुसरी घटना आहे कर्जत तालुक्यातील नेरळ येथील ममदापुर भागातील सौशिल्या सोसायटी मधील, या सोसायटी मध्ये ७० ते ७५ टक्के रहिवासी हे मुस्लिम समाजाचे आहेत. उर्वरित यामध्ये खूप कमी प्रमाणात मराठी आणि इतर भाषिक आहेत जे एकत्रित येऊन सर्व कार्यक्रम व उपक्रम राबवित असतात. १४ एप्रिल रोजी या सोसायटी मध्ये ६ वी भीमजयंती साजरी करत असतांना काही समाजकंटाकांनी वारंवार पोलीस मदत केंद्र (१०० क्रमांक) यावर दूरध्वनीद्वारे संपर्क करून आम्हाला त्रास होतं असल्याचे सांगून पोलिसांद्वारे कार्यक्रम बंद पाडण्याकरिता दबाव तंत्र वापरले. परंतु या कार्यक्रमाची माहिती सोसायटी मधील सदस्यांनी स्थानिक पोलीसांना आधीच दिली असल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल वरोटे यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. गच्चे यांना कार्यक्रम सुरु ठेवण्याकरिता आदेश दिले, तरीसुद्धा त्याच समाजकंटकाद्वारे वारंवार १०० क्रमांकावर तक्रार येत राहिल्याने कार्यक्रम आटोपता घ्यावा लागला.

ह्यामुळे भीम अनुयायिंमध्ये तीव्र नाराजी पाहवयास मिळाली. काही काळ तणावाचे वातावरण तयार झाले परंतु पोलिसांच्या मध्यस्थी नंतर वातावरण शांत झाले. सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना सदर इसमाची तक्रार भीम सैनिकांनी केली असून वातावरण गढूळ करणाऱ्या व जातीय तेढ निर्माण करणाऱ्या समाजकंटाकला समज देण्याकरिता पावले उचलण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

याआधी देखील ६ डिसेंबर रोजी दादर येथील चैत्याभूमीवर दर वर्षी सबंध भारतामधून भीम अनुयायी डॉ बाबासाहेब आबेडकरांना अभिवादन करण्यासाठी येतात. डिसेंबर २०२५ रोजी सोशल मीडियावरील काही इनफ्लूएन्सर ने तेथील स्थानिकांची मते जाणून घेण्यासाठी podcast बनविला. तेथे त्यांना असे समजले की स्थानिक लोकांच्या मनात चैत्यभूमी व तेथे येणारे अनुयायी यांच्या बद्दल किती द्वेष आहे.

अशा घटना वारंवार घडणे लोकशाहिला साजेशी गोष्ट नाही. हे असे का घडत आहे? भारताला इतके महान संविधान बाबासाहेबांनी बहाल केले आणि त्यांच्याच कार्यक्रमात हा द्वेष इतरांकडून का व्यक्त केला जातो? आज बाबासाहेबांच्या जयंतीला विरोधात करण्याचा हा नवीन पायंडा का पडला जात आहे? यामागचे सूत्रधार कोण आहेत? हे कोणी जाणीवपूर्वक तर करत नाही ना? यामागे कोणाचे राजकारण तर नाही ना? ह्या घटना पाहता हा विरोध कशासाठी केला जात आहे? कोणाच्या सांगण्यावरून केला जात आहे? या मागचा नेमका उद्देश काय?

हिंदू-मुस्लिम यासारख्या दंगली बौद्ध आणि इतर समाजामध्ये घडवण्याचा प्रयत्न होत आहे का?

असे अनेक प्रश्न निर्माण होताना दिसून येत आहे. यावर वेळीच लक्ष देणे फार गरजेचे आहे.

# पिस्तूलने गोळी घालण्याची धमकी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : मारहाण करून पिस्तूलने गोळी घालीन आणि सगळ्यांना उडवून टाकेल अशी धमकी दिल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात 15 एप्रिल रोजी अली (पेठ गाव) सलीम खान (भाताण) दिनेश पाटील (नांदगाव) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.14 एप्रिल रोजी रात्री सव्वा नऊच्या सुमारास समसुदिन आणि पियुष सुरते हे पेठ गाव येथे अंगणवाडी शाळेजवळ गेले. यावेळी महिलेची छेड काढणाऱ्या अली याला जाब विचारला त्यांच्यात भांडण झाले. त्यानंतर अली याने मित्रांना बोलावून घेतले. सलीम खान, दिनेश पाटील यांनी समसुद्दीनला हाताने मारहाण केली आणि सलीम याने पिस्टल काढली. आणि दिनेश पाटील याने समसुदिनच्या चेहऱ्यासमोर पकडून तुला गोळी घालेन आणि सगळ्यांना उडवून टाकेल असे बोलून दोघांना मारहाण केली. त्यानंतर त्या ठिकाणी काही नागरिक जमले असता दिनेश पाटील याने नरेंद्र मुंडकर यांच्या कानाजवळ पिस्तूल धरून धमकावले आणि शिवीगाळ केली.

# कारची मोटरसायकलला धडक, एक जण जखमी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी** : कारने मोटरसायकलला धडक दिल्याने 43 वर्षीय इसम जखमी झाला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात 13 एप्रिल रोजी कार चालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.राजेश कांबळे हे पळस्पे अरिहंत असपायर बिल्डिंग येथे राहत असून




ते एफ झेड मोटरसायकल क्रमांक एम एच ०६ सी एच 9652 वरून येऊन बिल्डिंग समोर गेटवर थांबले होते. त्यावेळी पाठीमागून आलेल्या कार क्रमांक एम एच ०७ क्यू 5011 वरील चालकाने त्यांच्या मोटरसायकलला धडक दिली. यावेळी ते खाली पडून जखमी झाले. त्यांना उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल केले. कारचालक भूषण रमेश गायकवाड यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# वावोशी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व महसूल समाधान शिबिरात 453 प्रमाणपत्रांचे वितरण

## कार्यक्रमाचे सुंदर नियोजन केल्याबद्दल वावोशी मंडळ अधिकारी सचिन वाघ यांच्यावर कौतुकांची थाप

**दैनिक युवक आधार**
**खालापूर - संतोष शेवाळे** : खालापूर तालुक्यातील वावोशी महसूल मंडळात महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ४५३ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले असून नागरिकांच्या विविध महसुली अडचणींचे तात्काळ निराकरण करण्यात आले.



या शिबिरामध्ये फेरफार २७, ७/१२ दुरुस्ती १२, डिजिटल सातबारा वितरण ३२, ८-अ उतारा वितरण २२, प्रमाणपत्र वितरण ३२०, जिवंत सातबारा मोहीम अंतर्गत ३६ नोंदी तसेच भोगवटदार वर्ग २ चे वर्ग १ मध्ये रूपांतर ४ प्रकरणे निकाली काढण्यात आली. या अभियानाची सुरुवात खालापूरचे तहसीलदार अभय चव्हाण, रायगड जिल्हा परिषद सदस्या रेश्मा पाटील व पंचायत समिती उपसभापती भाई शिंदे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. या कार्यक्रमाला माजी जिल्हा परिषद सदस्य विजय पाटील, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, मंडळ अधिकारी सचिन वाघ, सरपंच ॲड. रमेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते राजेश पाटील, वैद्यकीय अधिकारी सीमा पाईकराव, मानसी पाटील यांच्यासह वावोशी मंडळ क्षेत्रातील सर्व तलाठी, कोतवाल, पोलीस पाटील तसेच खालापूर तहसील कार्यालयातील कर्मचारी व मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते. यावेळी बोलताना मान्यवरांनी महसूल विभागाच्या माध्यमातून नागरिकांना घरपोच सेवा देण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील शेतकरी, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांना एकाच ठिकाणी विविध सेवा उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम असल्याचे त्यांनी नमूद केले. तहसीलदार अभय चव्हाण यांनी सांगितले की, महसूल विभाग हा नागरिकांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत प्रत्येक टप्प्यावर कार्यरत असून या शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना कार्यालयात हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी प्रशासन त्यांच्या दारी पोहोचत आहे. औद्योगिकीकरणामुळे बदलणाऱ्या परिस्थितीतही सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तर भाई शिंदे यांनी या शिबिरात मिळणारे दाखले आणि महसूल मध्ये होणारी कामे या सदर्भात योग्य मार्गदर्शन करू सर्वांचे लक्ष वेधून घेतलं तालुक्यातील विद्यार्थी आणि जेष्ठ नागरिकांना सहकार्य करून त्यांना लागणारी कागदपत्रे लवकरात लवकर देण्याचे अहवान महसूल विभागाला केले.

# खालापुरात वनजमिनीवर बेकायदेशीर अतिक्रमणाचा विळखा ; आगीच्या घटनेनंतरही कारवाईचा अभाव – ग्रामस्थांचा संताप

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर** : खालापुर तालुक्यातील मौजे हाळखुर्द (स.न. ७) आणि मौजे हाळ बुद्रुक (स.न. ७२) येथील वनविभागाच्या मालकीच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या संदर्भात धतुरे, बेटिकर, बेडेकर, वेदेकर व अन्य स्थानिक कुटुंबीयांनी वनपरिक्षेत्र अधिकारी, खालापुर यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.





तक्रारीनुसार, संबंधित वनजमिनीवर बेकायदेशीररित्या रस्ते तयार करणे, विजेचे खांब उभारणे, स्टोन क्रशर व इतर व्यावसायिक उपक्रम सुरू ठेवणे असे प्रकार सुरू आहेत. दि. १६ मार्च २०२६ रोजी एका भंगार गोदामाला भीषण आग लागली होती. हा प्रकार झाले असताना हि असुरक्षित भंगार व्यवसाय रोखण्यात अपयश मिळत असल्याची आरोपाची चर्चा जोर धरत आहे. बेकायदेशीर नियमबाह्य पद्धतीने चालू असलेल्या या प्रकारामुळे वनसंपत्ती, झाडेझुडपे, वन्यजीव आणि पक्ष्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून स्थानिक नागरिकांना श्वसनाचे त्रासही सहन करावे लागत आहेत.

या प्रकरणी वन (संरक्षण) , भारतीय वन पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ या कायद्यांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. या कायद्यांनुसार वनजमिनीवर कोणतेही अनधिकृत बांधकाम, झाडांची कत्तल किंवा औद्योगिक वापर करणे दंडनीय गुन्हा आहे.

तक्रारदारांनी असा आरोप केला आहे की, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गालगत इतका उघडपणे बेकायदेशीर कारभार सुरू असतानाही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. वन खात्याच्या अनेक परवानग्यामुळे राष्ट्रीय महामार्गावर अनेक विकास कामांना अजून मंजुरी मिळाली नाही पण दुसरीकडे मात्र त्याला लगत असलेल्या खाजगी गृहनिर्माण संस्था व मरीन शिक्षण संस्था, क्रशर, रिसायकल करणारे भंगारवाले यांना मात्र सूट दिली असल्याचे चित्र समोर येत आहे. या चर्चेमुळे काही अधिकाऱ्यांचे या प्रकरणात संगनमत असल्याची शक्यता व्यक्त होत असून आर्थिक हित संबंध असल्याचा संशयही ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.तसेच, वनपरिक्षेत्रातील अतिक्रमणांना अप्रत्यक्षपणे सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्याने भविष्यात या भागात पर्यावरणाला घातक ठरणारे प्रदूषण प्रकल्प उभारले जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही ठिकाणी झाडांची मोठ्या प्रमाणात कत्तल करून रस्ते तयार करण्यात आले असून त्यामुळे पर्यावरणीय संतुलन धोक्यात आले आहे. खोपोली शहरातील काही स्टील प्लांट मधून निघणाऱ्या वेस्ट मटेरियल ज्याने आरोग्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत धोकादायक असते अशी पांढरी मातीचा भराव या वनपरिक्षेत्रात टाकल्याने त्या जमिनीवर परत कुठल्याही प्रकारची जीव वनस्पती जगत ठिकत नाही अशा भयंकर मातीच्या ढिगाराला रस्ता बनवण्यासाठी वापरले जाते.

या सर्व पार्श्वभूमीवर ग्रामस्थ, पर्यावरणप्रेमी संस्था आणि पत्रकार यांनी प्रशासनाला इशारा देत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. बेकायदेशीर अतिक्रमण हटवून वनजमिनीचा ताबा पुन्हा मिळवावा, संबंधितांवर कडक दंडात्मक कारवाई करावी तसेच या प्रकरणात निष्क्रियता किंवा संगनमत असलेल्या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. आता प्रशासन कोणती भूमिका घेते आणि वनसंपत्तीचे रक्षण करण्यासाठी कितपत कठोर पावले उचलते, याकडे संपूर्ण खालापुर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# सणसर येथे डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांची मिरवणुक उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय** : सणसर ता.इंदापूर येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला व पंचशील पठण करण्यात आले मान्यवरांनी व ग्रामस्थांनी मोठ्या श्रद्धेने महामानवाला विनम्र अभिवादन केले



याकार्यक्रमास श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे संचालक शिवाजीराव निंबाळकर रामचंद्र निंबाळकर सर सणसरचे सरपंच यशवंत पाटील माजी सरपंच पांडुरंग भाऊ निंबाळकर विजय आबा पाटील पार्थ निंबाळकर महाराष्ट्र राज्य नाट्य परिषदचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले सोसायटीचे संचालक सोमनाथ उर्फ पिंटू गुप्ते,सामाजिक कार्यकर्ते विशाल पाटील विजय चव्हाण सर पोलीस पाटील राजेंद्र चव्हाण माजी सदस्य नानासो चव्हाण अजीजभाई तांबोळी प्रशांत निंबाळकर आदी मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले

मिरवणुकीच्या कार्यक्रमाचे आयोजन डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष व माजी उपसरपंच दिपक चव्हाण उपाध्यक्ष सुनील भाऊ लोंढे खजिनदार शाम भाऊ सोनवणे सचिव राजेंद्र महादेव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.यामध्ये विशाल महेंद्र चव्हाण शरद मारुती चव्हाण,,बापू चव्हाण,संजय चव्हाण विकास चव्हाण,विराज चव्हाण,माजी ग्रामपंचायत सदस्य रामदास चव्हाण अध्यक्ष ज्ञानदेव कांबळे तसेच कमिटीच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले महिलांनी देखील यामध्ये उस्फुर्त सहभाग नोंदवला.

कमिटीच्या वतीने भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून ग्रामस्थांनी त्यात मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथील विद्यार्थ्यांचा मा . मुख्य कार्यकारी अधिकारी साहेबांच्या हस्ते सन्मान



**दैनिक युवक आधार**
**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे** : दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा गणित विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन जिल्हास्तरावर करण्यात आले होते या स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथील विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे देऊन द्वितीय क्रमांक मिळवला. यामध्ये भाग्यश्री शिंदे ,स्नेहल जाधव व सार्थक खुळे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. गणित विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेचे बक्षीस वितरणचा कार्यक्रम दिनांक 17/ 4 /2026 ला कै. यशवंतराव चव्हाण सभागृह जालना येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना जिल्हा परिषदेच्या प्रा . शिक्षणाधिकारी मा.संगीता भागवत मॅडम यांची उपस्थिती होती तर प्रमुख अतिथी म्हणून जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. डॉ. कृष्णकांत कनवारिया साहेब तसेच उपशिक्षणाधिकारी मा.श्री संजयजी कायंदे साहेब व इतर मान्यवर उपस्थित होते .या स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवल्यामुळे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथील विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सन्माननीय श्री डॉ. कृष्णकांत कनवारिया साहेब जिल्हा परिषद जालना यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .यामध्ये द्वितीय क्रमांक मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांना स्पोर्ट किटचे वाटप करण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांचे व या परीक्षेसाठी मेहनत घेणारे शाळेचे मुख्याध्यापक श्री विजय कांगणे सहाय्यक शिक्षक श्री निलेश पिसे आणि श्री पंजाब दांडदे यांचे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मा.श्री गोविंद चव्हाण साहेब ,शिक्षण विस्ताराधिकारी मा.श्री के .जी. राठोड सर केंद्रप्रमुख मा.श्री एल. जे .खरात सर तसेच शाळा व्यवस्थापन समिती दूधा ग्रामपंचायत कार्यालय दुधा व पालकांनी अभिनंदन केले.


# पनवेल महानगरपालिकेच्या वतीने रविवारी ,१९ एप्रिलला भव्य 'खारघर हिल महापौर मॅरेथॉन (प्रोमो रन) चे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर** : पनवेल महानगरपालिकेच्या वतीने येत्या शनिवार, दिनांक १८एप्रिल २०२६ रोजी सेंट्रल पार्क, खारघर येथे भव्य 'खारघर हिल महापौर मॅरेथॉन' (प्रोमो रन) चे आयोजन करण्यात आले होते, परंतु शनिवार हा कामकाजाचा दिवस असल्याने अनेक नागरिकांनी केलेल्या विनंतीनुसार व योग्य वाहतूक नियोजनासाठी वाहतूक पोलिसांच्या सोयीसाठी महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांनी 'खारघर हिल महापौर मॅरेथॉनचे' नियोजन रविवार दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी केले आहे. निसर्गरम्य खारघर हिलच्या सानिध्यात होणाऱ्या या स्पर्धेत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

खारघर हिल महापौर मॅरेथॉन (प्रोमो रन) चे वैशिष्ट्य

खारघर हिलच्या निसर्गरम्य वातावरणामुळे ही मॅरेथॉन धावपटूंसाठी एक वेगळा अनुभव देणारी ठरणार आहे. या प्रोमो रनच्या माध्यमातून फिटनेस प्रेमींना एकत्र आणण्याचा प्रशासनाचा मानस आहे. नागरिकांमध्ये आरोग्याप्रती जागरूकता निर्माण व्हावी आणि शहरात क्रीडा संस्कृती वाढावी, या उद्देशाने ही मॅरेथॉन आयोजित केली जात आहे.

खारघर हिल महापौर मॅरेथॉन (प्रोमो रन) 10 किमी व 05 किमी अशा दोन गटांमध्ये होणार आहे. 10 किमी मॅरेथान सकाळी 5.45 तर 5 किमी मॅरेथॉन सकाळी 6.30 सुरू होणार आहे. पनवेल आणि नवी मुंबई परिसरातील जास्तीत



जास्त नागरिकांनी, व्यावसायिक धावपटूंनी आणि क्रीडाप्रेमींनी या 'प्रोमो रन'मध्ये सहभाग घेण्याचेआवाहन पनवेल महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

ज्या नागरिकांना या मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हायचे आहे त्यांनी आपली नोंदणी https://forms.gle/Sk5YL-Fit2cvL9QD99 या लिंकवरती त्वरित करून या भव्य क्रीडा सोहळ्याचा भाग व्हावे.

**मॅरेथॉनचा मार्ग**

*५ कि.मी. मॅरेथॉनसाठी मार्ग *

सेंट्रल पार्क - इस्कॉन मंदिर - ग्रामविकास भवन - मुर्बी मेट्रो स्टेशन -मुर्बी जंक्शन यू टर्न - लोकनेते रामशेठ ठाकूर शाळा, सेक्टर 19 - ग्रामविकास भवन - सेंट्रल पार्क

*१० कि.मी. मॅरेथॉनसाठी मार्ग*

सेंट्रल पार्क -इस्कॉन मंदिर - ग्रामविकास भवन - मुंर्बी मेट्रो स्टेशन - मुर्बी जंक्शन यू टर्न - लोकनेते रामशेठ ठाकूर शाळा, सेक्टर 19 - ग्रामविकास भवन - उत्सव चौक - बेलापाडा मेट्रो स्टेशन यू टर्न - उत्सव चौक- गोल्फ कोर्स -सेंट्रल पार्क

स्पर्धेची अधिक माहिती

दिनांक: शनिवार, १९ एप्रिल २०२६

स्थळ: सेंट्रल पार्क, खारघर

प्रमुख आयोजक : पनवेल महानगरपालिका

# अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेऊ नका – पालकांना महापालिकेचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी** : पनवेल महानगरपालिका क्षेत्रात शासनाची परवानगी न घेता सुरू असलेल्या प्राथमिक शाळांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित पालकांना आपल्या पाल्यांचा प्रवेश अशा अनधिकृत शाळांमध्ये करू नये, असे आवाहन महापालिकेतर्फे आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, खालील शाळा अनधिकृत असून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

१.मार्शमेलोज इंटरनॅशनल स्कूल, ओवे

२.काळसेकर इंग्लिश मिडियम स्कूल, तळोजा पाचंद

३.अर्कम इंग्लिश स्कूल, तळोजा

४.ओशीन ब्राईट कॉन्व्हेंट स्कूल, तळोजा

५.ऑक्सफर्ड इंग्लिश मिडियम स्कूल, कळंबोली

६.बजाज इंटरनॅशनल स्कूल, तळोजा

७.दि वेस्ट हिल हाय इंटरनॅशनल स्कूल, तळोजा

वरील शाळा सुरू होण्यापूर्वीच त्यांना अनधिकृत घोषित करण्यात आले असून, पालकांनी आपल्या पाल्यांचे प्रवेश या शाळांमध्ये करू नयेत. पालकांना कळविण्यात येते की आपल्या पाल्यांचा प्रवेश घेत असताना सदरची शाळा अधिकृत असल्याची खात्री करावी.

तसेच, ज्या पालकांनी आधीच या वरील शाळांमध्ये प्रवेश घेतला आहे, त्यांनी तात्काळ तो रद्द करून अधिकृत शाळांमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पनवेल महानगरपालिका नागरिकांच्या हितासाठी कटिबद्ध असून, शिक्षणाच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असेही प्रशासनाच्या वतीने अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे यांनी सांगितले आहे.

# श्री क्षेत्र भंडारा डोंगर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**अंभोरा प्रतिनिधी/बाळासाहेब रकटाटे** : जगद्गुरु तुकाराम महाराज संतसंग मंडळ कुंभेफळ बाळेवाडी पंचक्रोशी यांच्या वतीने श्री क्षेत्र भंडारा डोंगर येथे अखंड हरिनाम सप्ताह व पंचवेद गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

व्यासपीठ चालक . ह.भ.प. गाडे महाराज कुंभेफळ ह.भ.प. विठ्ठल महाराज वाळके

ह.भ.प. नारायण महाराज गिरी

ह.भ.प. निर्मलाताई गोरणे (श्रीरामपूर)

ह.भ.प. चंदन महाराज पारखे राहुरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा धार्मिक सोहळा ३० एप्रिल सुरू होऊन ७ मे या कालावधीत विविध प्रवचन कीर्तन व धार्मिक कार्यक्रमांनी रंगणार आहे.

सप्ताहादरम्यान दररोज पहाटे काकडा, सकाळी गाथा पारायण, दुपारी भजन आणि सायंकाळी प्रवचन व हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. विविध मान्यवर कीर्तनकार व प्रवचनकार यांचे मार्गदर्शन लाभणार असल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.या सोहळ्यात ह.भ.प. नारायण महाराज गिरी, ह.भ.प. निर्मलाताई गोराणे, ह.भ.प. सोमिनाथ महाराज आम्रीत ह.भ.प. चंदन महाराज पारखे, ह.भ.प. स्वामी रामानंद महाराज, ह.भ.प. रामदास दादा रकटाटे आदींची उपस्थिती लाभणार आहे.सप्ताहाच्या समारोपदिनी दि. ७ मे रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. वैराग्यमूर्ती राऊत दादा यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महाप्रसादासाठी हरिश्चंद्र (बबन) मल्हारी गाडे कुंभेफळ यांच्यातर्फे व्यवस्था करण्यात आली आहे.या सप्ताहानिमित्त परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण होणार असून, पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ह भ प गाडे महाराज कुंबेफळ यांनी केले आहे.

# गाडी शिकणे ही आत्मनिर्भरतेची दिशा'

## लांजाच्या छाया गांगण यांचा 'अथर्व मोटार ट्रेनिंग'च्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा वसा

"गाडी शिकणे ही फक्त एक कला नसून ती आत्मनिर्भरतेची दिशा आहे," हे ब्रीदवाक्य उराशी बाळगून लांजा येथील छाया गांगण यांनी स्वावलंबनाचा एक आगळावेगळा उपक्रम यशस्वी केला आहे. आपल्या 'अथर्व मोटार ट्रेनिंग स्कूल'च्या माध्यमातून त्यांनी आतापर्यंत अनेक महिला व पुरुषांना दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे रितसर प्रशिक्षण देऊन त्यांना खऱ्या अर्थाने 'स्वयंपूर्ण' बनविले आहे.

२०१९ मध्ये झाली सुरुवात

छाया गांगण यांनी २०१९ मध्ये अथर्व मोटार ट्रेनिंग स्कूलची स्थापना केली. विशेष म्हणजे, या क्षेत्रात महिलांचे प्रमाण अत्यंत कमी असताना, पती मंदार गांगण यांच्या प्रेरणा आणि सहकार्यामुळे त्यांनी हे आव्हानात्मक पाऊल उचलले. लग्नापूर्वी गाड्यांची कोणतीही पार्श्वभूमी नसताना, केवळ जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी आज या क्षेत्रात स्वतःचा वेगळा ठसा उमटवला आहे. बी.कॉम पर्यंत शिक्षण झालेल्या छाया गांगण यांनी 'काहीतरी नवीन' करण्याच्या ध्यासातून सुरू केलेला हा प्रवास आज लांजातील अनेक महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

२५० हून अधिक महिलांना प्रशिक्षण

आजवर या ट्रेनिंग स्कूलमधून सुमारे २५० महिलांनी वाहन चालविण्याचे धडे घेतले आहेत. यामध्ये केवळ तरुणीच नव्हे, तर वयाची साठी ओलांडलेल्यांचाही समावेश आहे. ज्यांना साधी सायकलही चालवता येत नव्हती, त्यांना श्रीमती गांगण यांनी आत्मविश्वासाने गाडी चालवायला शिकविले आहे. यामध्ये नोकरदार महिला व शिक्षिका, अंगणवाडी सेविका, पिग्मी एजंट, गृहिणी या सर्वांचा समावेश आहे. महिलांनी केवळ गृहिणी न राहता स्वतःच्या पायावर उभे राहावे, हाच यामागचा मुख्य उद्देश असल्याचे श्रीमती गांगण सांगतात.

एसटी बस चालविण्यापर्यंतची मजल

श्रीमती गांगण यांच्या प्रशिक्षणाचे एक वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण म्हणजे एसटी महामंडळाच्या वर्कशॉपमध्ये कार्यरत असलेल्या महिलेने सेवानिवृत्तीला केवळ सहा महिने शिल्लक असताना प्रशिक्षण घेतले. त्यानंतर त्या केवळ दुचाकी-चारचाकीच नव्हे, तर वर्कशॉपमध्ये एसटी बसही पुढे मागे (Forward-Reverse) करु लागल्या. अनेक महिलांनी तर रस्ते सुरक्षा नियमांचे पालन करत स्वतःचे छोटे-मोठे व्यवसायही सुरू केले आहेत.

रस्ता सुरक्षा अभियान आणि सन्मान

केवळ वाहन प्रशिक्षणच नव्हे, तर 'रस्ता सुरक्षा अभियाना'अंतर्गत छाया गांगण यांनी विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जनजागृतीचे कार्यक्रम राबवले आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

कुटुंबाचे चाक हाती असणारी महिला मोटार ट्रेनिंग स्कूलचे चाकही यशस्वी पणाने हाती धरु शकते हे दाखवून देणाऱ्या श्रीमती गांगण यांची ही प्रेरणादायी गोष्ट आहे.

**- अमृता भातडे-धुंदूर**
**जिल्हा माहिती कार्यालय, रत्नागिरी**

# नारी शक्ती : मूलभूत सन्मानापासून स्वतःच्या अवकाशापर्यंत

"स्त्रियांना फक्त गृहिणी म्हणून पाहण्याचे दिवस गेले;
आता त्यांना राष्ट्रनिर्माते म्हणून पाहण्याची गरज आहे."
– असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नुकतेच म्हटले

भारतातील एखाद्या गावातील तिशीतली स्त्री डोळ्यासमोर आणा. काही वर्षांपूर्वी ती पहाटे अंधारात, भीतीच्या छायेत घराबाहेर जाऊन नैसर्गिक विधी आटोपत असे. घरातील सर्वांसाठी पाणी दूरवरून आणणे, लाकडाच्या धुरात स्वयंपाक करणे, स्वतःच्या नावावर घर नसणे, बँक खाते नसणे—अशा अनेक मर्यादांमध्ये तिचे आयुष्य अडकलेले होते. पण आज ही परिस्थिती बदलली आहे. या परिवर्तनाचे नाव आहे—'नारी शक्ती'. गेल्या काही वर्षांत महिलांच्या जीवनातील प्रत्येक पैलू एकमेकांशी जोडून बदल घडविण्याचा प्रयत्न झाला आहे.

**सन्मानाला प्राधान्य**

महिलांच्या सन्मानाची सुरुवात मूलभूत गरजांपासून झाली. स्वच्छ भारत अभियानातून कोट्यवधी शौचालयांची निर्मिती झाली आणि ग्रामीण भारत खुले शौचालयमुक्त झाला. यामुळे महिलांना सन्मान मिळाला. जल जीवन मिशनमुळे घराघरात नळजोडणी झाली आणि पाण्यासाठी होणारी दररोजची कसरत कमी झाली. उज्ज्वला योजनेतून महिलांच्या नावावर गॅस कनेक्शन मिळाले, धुरामुळे होणारे आरोग्याचे त्रास कमी झाले. प्रधानमंत्री आवास योजनेत महिलांच्या नावावर घरे देण्यात आली, ज्यामुळे त्यांना मालकी हक्क आणि आर्थिक सुरक्षितता मिळाली.

शौचालय, पाणी, इंधन आणि घर, हे केवळ योजनांपुरते नसून सन्मान पुनर्स्थापित करण्याचा एकत्रित प्रयत्न आहे.

**जन्मापासून आरोग्याची हमी**

आता महिलांच्या सक्षमीकरणाची सुरुवात जन्मापूर्वीपासूनच होते. पोषण अभियान बालकांच्या पहिल्या १००० दिवसांवर लक्ष केंद्रित करते. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेतून मातांना थेट आर्थिक मदत मिळते. सुरक्षित मातृत्व आश्वासन 'सुमन' योजना राबविण्यात आली आहे. तसेच प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि जीवन ज्योती विमा योजना यामुळे महिलांना आर्थिक संरक्षण मिळाले. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'मुळे मुलींच्या जन्मदरात सुधारणा झाली, तर 'सुकन्या समृद्धी' योजनेमुळे मुलींचे भविष्य सुरक्षित झाले.

**जगण्यापासून स्वप्नांकडे**

आर्थिक स्वावलंबन हा सक्षमीकरणाचा कणा आहे. जनधन योजनेमुळे कोट्यवधी महिलांना बँकिंग व्यवस्थेशी जोडले गेले. मुद्रा योजनेत महिलांना मोठ्या प्रमाणावर कर्ज मिळाले. स्वयं-सहायता गटांच्या माध्यमातून महिलांनी उद्योग, व्यवसाय सुरू केले. 'लखपती दीदी' ही संकल्पना ग्रामीण महिलांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. 'नमो ड्रोन दीदी'सारख्या उपक्रमातून महिलांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जात आहे.



**सुरक्षा आणि न्याय**

महिलांच्या सुरक्षिततेसाठी 'मिशन शक्ती' अंतर्गत सखी वन-स्टॉप केंद्रे सुरू करण्यात आली आहेत, जिथे कायदेशीर, वैद्यकीय आणि समुपदेशन सेवा एकाच ठिकाणी मिळतात. महिला हेल्पलाईन, निर्भया निधी आणि इतर उपक्रमांनी सुरक्षा यंत्रणा अधिक मजबूत केली आहे. तात्काळ तीन तलाक बंदी हा महिलांच्या अधिकारांसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

**महिलांचा अवकाश**

आज भारतीय महिला प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होत आहेत. अवकाश संशोधनापासून संरक्षण क्षेत्रापर्यंत त्यांनी आपली छाप पाडली आहे. महिला आता केवळ सहभागी नाहीत, तर नेतृत्वही करत आहेत. एसटीईएम क्षेत्रातही महिलांची संख्या वाढत आहे.

**संवैधानिक टप्पा**

'नारी शक्ती वंदन अधिनियम' हा महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाचा ऐतिहासिक निर्णय आहे. लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना ३३% आरक्षण देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पंचायती राज व्यवस्थेतही जवळपास अर्ध्या प्रतिनिधी महिला आहेत. महिलांचे नेतृत्व वाढल्यास समाजातील विकास अधिक सर्वसमावेशक होतो, हे सिद्ध झाले आहे.

**३६० अंशांचा दृष्टिकोन**

शौचालय, पाणी, इंधन, घर, आरोग्य, रोजगार, सुरक्षा आणि प्रतिनिधित्व—हे सर्व घटक एकमेकांशी जोडलेले आहेत. यापैकी एक जरी तुटला, तरी सक्षमीकरणाची साखळी अपूर्ण राहते. म्हणूनच हा ३६० अंशांचा दृष्टिकोन आहे—महिलांच्या संपूर्ण जीवनाचा विचार करणारा.आज भारत 'कल्याणकारी' दृष्टीकोनातून 'महिला-नेतृत्वाखालील विकास' या दिशेने वाटचाल करत आहे. या प्रवासात प्रत्येक महिलेला सोबत घेणे हीच खरी प्रगती ठरेल.'नारी शक्ती पुढे चालली आहे; आता देशाने कोणतीही महिला मागे राहू देऊ नये.'

**आर. विमला (भा.प्र.से.)**
**सचिव तथा निवासी आयुक्त,**
**महाराष्ट्र सदन,**
**नवी दिल्ली**

# महिला सक्षमीकरण;

## जिद्द, प्रशिक्षण आणि परिश्रमाची जोड

### खाटेघरच्या सविता गायकर यांनी फुलवला मशरूम शेतीतून यशाचा मळा

बदलत्या काळात महिलांनी केवळ चूल आणि मूल यापुरते मर्यादित न राहता उद्योजकतेच्या क्षेत्रात भरारी घ्यावी, हे केंद्र व राज्य शासनाच्या 'महिला सक्षमीकरण' मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. हेच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील खाटेघर येथील एका जिद्दी तरुणीने शेतीपूरक व्यवसायातून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. कु. सविता हरिश्चंद्र गायकर असे या यशस्वी महिला उद्योजिकेचे नाव असून, त्यांनी मशरूम शेतीसारख्या आधुनिक प्रयोगातून ग्रामीण भागात रोजगाराची नवी वाट दाखवली आहे.

बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण केल्यानंतर सविता यांच्या मनात स्वतःच्या पायावर उभे राहण्याची तीव्र इच्छा होती. केवळ नोकरीच्या शोधात न राहता काहीतरी नाविन्यपूर्ण करावे, या विचारात असतानाच त्यांना रोजगार व 'EAP' कार्यक्रमाच्या माध्यमातून ठाणे येथील 'महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थे'ची (RSETI) माहिती मिळाली. याच माहितीच्या जोरावर त्यांनी आपल्या स्वप्नांना खतपाणी घालण्याचे ठरवले आणि संस्थेतील 'मशरूम शेती' या १० दिवसांच्या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेतला.





प्रशिक्षणाच्या या अल्प कालावधीत त्यांनी मशरूम उत्पादनाची तांत्रिक प्रक्रिया, त्याची शास्त्रोक्त देखभाल, पॅकेजिंग आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे व्यवसाय व्यवस्थापन व मार्केटिंगचे बारकावे आत्मसात केले. प्रशिक्षण पूर्ण होताच २२ डिसेंबर २०२५ रोजी त्यांनी ५० हजार रुपयांच्या प्राथमिक गुंतवणुकीतून आपल्या व्यवसायाचा श्रीगणेशा केला. सुरुवातीला काही अडचणी आल्या, परंतु प्रशिक्षणातून मिळालेला आत्मविश्वास आणि घेतलेली मेहनत यामुळे त्यांनी दर्जेदार मशरूमचे उत्पादन घेण्यात यश मिळवले.

आज सविता यांनी उत्पादित केलेल्या मशरूमला स्थानिक बाजारपेठेत मोठी मागणी असून, ग्राहकांकडूनही त्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. या व्यवसायातून त्या दरमहा १० हजार रुपयांपर्यंतचे उत्पन्न मिळवत असून, त्यांनी स्वतःसाठी शाश्वत रोजगार निर्माण केला आहे. आर्थिक स्वावलंबनासोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातही मोठा बदल झाला आहे. "योग्य प्रशिक्षण आणि कष्टाची तयारी असेल तर यश नक्कीच मिळते," हा मंत्र त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केला आहे.

सविता यांचा हा यशस्वी प्रवास केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर परिसरातील इतर महिलांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. भविष्यात आपल्या या व्यवसायाचा विस्तार करून मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेण्याचा आणि इतर गरजू तरुण-तरुणींना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याचा त्यांचा मानस आहे. शासनाच्या महिला सक्षमीकरण मोहिमेचा खरा अर्थ सविता गायकर यांच्या या यशोगाथेमुळे अधोरेखित झाला आहे.

# महिला सक्षमीकरण;

## अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालत

### सौ. आर्या जोशी यांनी प्रज्वलित केली महिला सक्षमीकरणाची ज्योत

केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने सध्या महिला सक्षमीकरणाची मोहीम राज्यभर मोठ्या उत्साहात राबवली जात आहे. महिला केवळ चूल आणि मूल इथपर्यंत मर्यादित न राहता, त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर विविध क्षेत्रांत स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करावे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. याच मोहिमेला बळ देणारे एक प्रेरणादायी नाव म्हणजे सौ. आर्या जोशी. 'ब्रम्हतेज' संस्थेच्या संस्थापक आणि संचालक असलेल्या सौ. आर्या जोशी यांनी अध्यात्म, ज्योतिष आणि वैदिक विधी यांसारख्या पारंपरिक क्षेत्रांत आपल्या कार्याचा असा काही ठसा उमटवला आहे की, आज हजारो लोकांसाठी त्या एक दीपस्तंभ ठरल्या आहेत.



सौ. आर्या जोशी यांचे कार्य केवळ धार्मिक विधींपुरते मर्यादित नाही, तर त्यांच्या कार्याला एक भक्कम वैचारिक आणि वैज्ञानिक जोड आहे. मुळात वैद्यकीय क्षेत्रातील शिक्षण आणि दांडगा अनुभव गाठीशी असल्याने, त्या कोणत्याही समस्येकडे केवळ धार्मिक दृष्टिकोनातून न पाहता, त्यामागील शास्त्र आणि तर्क शुद्धपणे मांडतात. अध्यात्म आणि विज्ञान यांचा हा अपूर्व संगम त्यांच्या मार्गदर्शनातून दिसून येतो. आजच्या धावपळीच्या युगात जेव्हा माणूस मानसिक तणाव आणि अस्थिरतेने ग्रासलेला असतो, तेव्हा सौ. आर्या जोशी यांनी सुचवलेले ज्योतिषीय उपाय आणि मंत्रसामर्थ्य अनेकांसाठी नवचैतन्य देणारे ठरले आहे.

गेल्या अनेक वर्षांच्या त्यांच्या या समर्पित प्रवासात त्यांनी 'ब्रम्हतेज' संस्थेच्या माध्यमातून तब्बल २५,००० हून अधिक यजमानांना विविध धार्मिक सेवा अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने प्रदान केल्या आहेत. एवढेच नव्हे, तर ५,००० पेक्षा जास्त व्यक्तींना ज्योतिष आणि आध्यात्मिक विषयांवर सखोल मार्गदर्शन करून त्यांच्या विस्कळीत झालेल्या आयुष्यात सकारात्मक बदलाची पहाट आणली आहे. मग ती अडचण वैयक्तिक असो, कौटुंबिक असो वा व्यावसायिक, सौ. आर्या जोशी यांच्याकडे असलेल्या अनुभवाच्या शिदोरीतून त्यांनी अनेकांना योग्य निर्णय घेण्याची दिशा दिली आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक कुटुंबांमध्ये सुख, शांती आणि आर्थिक स्थैर्य नांदू लागले आहे.

मंत्रांच्या उच्चारातून निर्माण होणारी ऊर्जा आणि त्यातून मिळणारे मानसिक समाधान हेच लोकांच्या आयुष्यातील दुःख दूर करण्याचे प्रभावी साधन आहे, असा त्यांचा ठाम विश्वास आहे. केवळ कर्मकांड न करता, त्यामागील उद्देश आणि सकारात्मकता लोकांपर्यंत पोहोचवणे हेच त्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय मानले आहे.

पनवेल आणि नवी मुंबई परिसरातून सुरू झालेले त्यांचे हे कार्य आज सर्वदूर पसरले असून, महिला सक्षमीकरणाच्या या प्रवासात त्या एक यशस्वी उद्योजिका आणि मार्गदर्शक म्हणून उभ्या राहिल्या आहेत. त्यांच्या या यशामागे प्रचंड जिद्द, सखोल अभ्यास आणि समाजाप्रती असलेली सेवाभावी वृत्ती आहे.